www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी




मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : 30 बुधवार दि. ०८ ऑक्टोबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ

## भारताच्या प्रगतीचे नवे प्रतीक



**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्या (बुधवार, ८ ऑक्टोबर) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह काही केंद्रीय मंत्री देखील या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला नवी मुंबईतील नागरिक व भाजपासह महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहतील असं सांगितलं जात आहे. उद्घाटनाच्या ठिकाणी भव्य मंडपात २५ हजार लोकांसाठी आसनव्यवस्था करण्यात आली आहे.यावेळी काही सांस्कृतिक कार्यक्रमांचं देखील आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्यासह राज्यातील विविध प्रांतांतील लोककला, नृत्य, संगीत व पारंपरिक वाद्यवृंद सादर होणार आहेत.हे विमानतळ सुरू झाल्यानंतर मुंबईसह पुणेकरांची सोय होणार आहे. या विमानतळामुळे मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील ताण कमी होईल. तसेच ईशान्य मुंबईतील आणि पुण्यातील प्रवाशांना आंतरराष्ट्रीय प्रवास करण्यासाठी हे विमानतळ अधिक जवळ असेल.**

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी

मुंबईमहानगर प्रदेशाच्या मध्यभागी आणि आसपासच्या शहरी स्थानिक संस्थाशी उत्तम कनेक्टिव्हीटी असलेले असलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ,विद्यमान छत्रपती शवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळा वरीलगर्दी कमी करण्यास मदत करेल. नवी मुंबई आुंतरराष्ट्रीय हे विमानतळ केवळ मुंबई महानगर प्रदेशातील प्रवासी आणि मालवाहातुक कीची मागणी पूर्ण करण्यास मदत करेल असे नाही तर मुंबई,आणि नवी मुंबई व उर्वरित मुंबई महानगर प्रदेशातील लोकांसाठी प्रादेशिक आर्थिक वाढ, व्यवसायाच्या संधी, रोजगार आणि सुरळीत प्रवास अनुभवाला चालना देईल.

नवी मुंबई आुंतरराष्ट्रीय विमानतळसिडको आणि मुंबई आुंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेड यांनी स्थापना केलेल्या विषेश कंपनी – नवीमुंबई आुंतरराष्ट्रीय विमानतळलिमिटेड (NMIAL) द्वारे सार्वजनिक-खाजगी भागीदारीअंतर्गत विकसित केले जात आहे. ह्या कंपनी मध्ये अदानी विमानतळ होल्डींग्ज मुख्य प्रवर्तक आहे.

मुंबई महानगर प्रदेशासाठी (MMR दुसरे आुंतरराष्ट्रीय विमानतळ म्हणून पहिल्या टप्प्यात ₹19,647 कोटीखर्च करूनणन बांधलेले नवीमुंबई आुंतरराष्ट्रीय विमानतळ , मुंबई विमानतळावरील गर्दीकमी करण्यासाठी आणि मुंबईला जागतिक बहुविमानतळ प्रिालीं.च्या श्रेणीत आणण्यासाठी छत्रपती शवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ सोबत काम करेल. ज्यामुळे वार्षिक 150 दशलक्षपर्यंत एकत्रित प्रवासी क्षमता असलेले विमान वाहतूक केंद्र तयार होईल, आणि मुंबईलाआर्थिक पॉवरहाऊसमध्ये रुपांतरीत करेल.

रोजगार निर्मिती ही नवीमुंबई आुंतरराष्ट्रीय विवमानतळाची एक प्रमुख विशेषता आहे. या प्रकल्पामुळे बांधकामादरम्यान हजारो रोजगारनिर्माण झाले आहेत, त्यामुळे लाखो प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार सुंधी निर्माण होतील, विशेषता रायगड,ठाणे, कोकण आणि संपूर्ण महाराष्ट्रातील तरुणांना याचा फायदा होईल अशी अपेक्षा आहे.

नवी मुंबई आुंतरराष्ट्रीय विमानतळाची प्रमुख कार्यक्षमता

केवळ 1160 हेक्टर क्षेत्रफळ असलेले हे विमानतळ जगातील सर्वातकार्यक्षम विमानतळापैकी एक म्हणून डिझाईन केलेले आहे. या विमानतळावरून दरवषी 90 दशलक्ष प्रवासी आणि 3.25 दशलक्ष टन माल वाहून नेला जाईल. पहिल्या टप्प्यांतील सुविधा अनुक्रमे 20 एमपीपीए आणि 0.5 दशलक्ष मेट्रिकटन माल वाहून नेण्याची क्षमता प्रदान करतात. नवी मुंबई आुंतरराष्ट्रीय विमानतळा मध्ये दरवर्षी 3.25 दशलक्ष मेट्रिक टनापेक्षा जास्त माल वाहून नेण्याची क्षमता असलेली जागतिक दर्जाची हवाई माल वाहून नेण्याची सुविधा देखील समाविष्ट आहे. पायाभूत सुविधांमध्ये 3,700 मिटरलांबीचे दोनसमांतर कोड-4 एफ धावपट्ट्या आहेत, ज्याना वाढीव कार्यक्षमते साठी दुहेरी समांतर टॅक्सीवे आणि जलद एक्टझिट टॅक्सीवे द्वारे जोडले गेले आहे, पहिल्या टप्प्यात दक्षिण रनवे कार्यवंतित होत आहे.

भारतांतील पहिले खऱ्याअर्थाने बहु-मॉडेल विमानतळ

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ राष्ट्रीय महामार्ग,मुख्य शहरी रस्ते, उपनगरीय रेल्वे, मेट्रो आणि भविष्यासाठी तयार जलवाहुतुक द्वारे अखंडपणे जोडलेले आहे. हे विमानतळ जल वाहतुकद्वारे जोडलेले जाणारे पहिले विमानतळ असेल. हे विमानतळ मुंबई महानगर प्रदेशाच्या प्रत्येक कोपऱ्याशी जोडण्यासाठी एक अखंड मल्टी-मॉडल ट्रान्सपोर्ट नेटवर्क विकसित केले जात आहे अटलसेतू सारखे महत्त्वाचे प्रकल्प ,उलवे कॉस्टल रोड आणि प्रस्तावीत ठाणे- नवीमुंबई विमानतळ उन्नत मार्ग जलद,सिग्नलमुक्त रस्ते कनेक्टिव्हीटी प्रदान करतील, तर मेट्रो लाईन- 8 , 2031 पयंत नवीमुंबई मेट्रो विस्ताराच्या मदतीने नवी मुंबई आणि मुंबई विमानतळाला आणि मुंबईशी थेट जोडेलजाईल. उपनगरीय रेल्वे तारघर आणि खांदेश्वर स्थानकांद्वारे सुनिश्चित केली जाईल. या व्यतिरिक्त प्रस्तावित मुंबई-हैदराबाद हाय स्पीड रेल कॉरीडॉर विमानतळाच्या पूर्वेकडील परीघातून जाईल, ज्यामध्ये देशाच्या विविध प्रदेशांमध्ये आणि तेथून हाय-स्पीड प्रवेश सुनिश्चित करण्यासाठी एक भूमिगत स स्टेशनची योजना आहे, त्यामुळे प्रादेशिक कनेक्टिव्हीटी आणखीन मजबूत होईल.

नवी मुंबई आुंतरराष्ट्रीय विमानतळ: अद्वितीय वैशीष्ट्ये:

( ऑटोमेटेड पीपल मुव्हर (एपीएम) प्रणाली सुरळीत अंतर-टर्मिनल हस्तांतरणासाठी चारही प्रवासी टर्मिनल्सना जोडण्याची योजना आखली आहे, तसेच शहराच्या बाजूच्या पायाभूत सुविधांना जोडणारा लँडसाइड एपीएम देखील आहे.

( विमानतळावर विवमान इंधन (sustainable aviation fuel) साठी योग्य साठवणूक अंदाजे 47 मेगावॅट सौर ऊजा निर्मिती आणि शहरातीलसार्वजनिक कनेक्टिव्हीटीसाठी EV बस सेवा असतील.

( हे विमानतळ क्युरेटेड डिजिटल आणि



भौवतीक कला प्रतिष्टानाद्वारे महाराष्ट्र आणि भारताच्या संस्कृतिक परंपरेचे प्रदर्शनदेखील करेल, तर अनकूल,भविष्यासाठी तयार तुंत्रज्ञानाचा अवलंब केल्याने डीजीटल रिटेल, ड्युटी फ्री शॉपींग, बॅगेज हँडलीग आणि लाउुंज चेक-इनमध्ये अखंड प्रवेश सुनिश्चित होईल.

( पहिल्या टप्प्यात नवी मुंबई विमानतळ,29 कॉटँक्त एअरक्राफ्ट स्टँड 13रिमोट कर्मशियल स्टँड, 7 कार्गो् स्टँड आणि 38 जनरल एव्हीएशन (जीए) स्टँड काम करेल ज्यावर15 जीए हँगरस असतील, तसेच 1500 कार, 20 बस आणि 20ट्रकसाठी पार्किंग सुविधा असतील.

( अति महत्वाची व्यक्ती आणि खाजगी विमान वाहतूकीच्या गरजा पूर्णकरण्यासाठी अंतिम टप्प्यात जवळजवळ 100 जीए विमानस्टँड असलेले एक विकसित जीए टर्मिनल बांधण्याची योजना आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची संुचालन तयारी

नागरी विमान वाहतूक महासंचालकानी (DGCA) 30 सप्टेंबर 2025 रोजी NMIA ला एअरोड्रोम परवाना मुंजूर केला आहे, जो ऑपरेशन सरू होण्यापूवीचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. डीसेंबर 2025 मध्ये देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाण ऑपरेशन सरू होण्याची अपेक्षा असल्याने, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ भारताच्या प्रगती, आधुनिकता आणि भविष्यासाठी तयार असलेल्या विमान वाहतूक वाढीचे प्रतीक म्हणून हवाई प्रवास आणि पायाभूत सुविधांच्या मानकांची पूर्णपरिभाषा करण्यास सज्ज आहे 2047पर्यंत विकसित भारताकडे देशाच्या वाटचालीला बळकटी देण्याच्या दिशेने आपण आणखी एक पाऊल पुढेटाकले आहे



### नवी मुंबई विमानतळ आहे 'या' १० बाबतीत खास

१. पहिलं उड्डाण डिसेंबरमध्ये

या विमानतळाचं उद्घाटन ८ ऑक्टोबर रोजी होणार असलं तरी येथून व्यावसायिक उड्डाणं डिसेंबरमध्ये सुरू होतील. कोणत्या कंपनीला विमान उड्डाणाचा पहिला मान मिळणार हे अद्याप निश्चित नाही. एअर इंडिया, इंडिगो व अकासा एअर या कंपन्या सध्या स्पर्धेत आहेत.

२. विमानतळाला चार प्रवेशद्वारे, तीन व्यवस्थापन केंद्र

या विमानतळाला चार प्रवेशद्वारं असून अल्फा, ब्राव्हो व चार्ली अशी तीन सेंटर्स (व्यवस्थापन केंद्र) असतील, जिथून सर्व देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय प्रवाशांचं व्यवस्थापन केलं जाईल. विमानतळावर एकूण ८८ चेक-इन काउंटर्स असतील, त्यापैकी ६६ पारंपरिक काउंटर व २२ सेल्फ चेक-इन काउंटर असतील.

३. सुरुवातीला केवळ सकाळी ८ ते रात्री ८ पर्यंत उड्डाणे

सुरुवातीच्या काळात या विमानतळावरून सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत विमानांची उड्डाणं असतील. या विमानतळाची क्षमता ४० एटीएम (Air Traffic Movements) असून सुरुवातीला १० एटीएम चालू असतील. म्हणजेच प्रतितास १० विमानं उड्डाणं किंवा लँडिंग करू शकतील.

४. ४ टर्मिनल्स आणि २ समांतर धावपट्ट्या

या विमानतळावर ४ टर्मिनल्स आणि २ समांतर धावपट्ट्या (प्रत्येकी ३,७०० मीटर लांब आणि ६० मीटर रुंद) असतील. सध्या केवळ एक टर्मिनल व एक धावपट्टी सुरू असेल. दुसऱ्या टर्मिनलची डिझाइन प्रक्रिया चालू आहे. अदाणी समुहाने पहिल्या टप्प्यात २० हजार कोटी रुपये गुंतवले असून दुसऱ्या टप्प्यासाठी ३० हजार कोटी रुपये गुंतवले जाणार आहेत.

५. आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक केंद्र म्हणून उभारणी

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची उभारणी हे दुबई किंवा हीथ्रो विमानतळासारख्या आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक केंद्राप्रमाणे (International Aviation Hub) करण्यात आली आहे. सुरुवातीच्या टप्प्यात या विमानतळाची प्रवासी क्षमता वार्षिक दोन कोटी इतकी असून जी पुढील काळात ९ कोटींपर्यंत वाढवली जाणार आहे.

६. शांघायसारखं मालवाहतूक केंद्र

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या प्रकलांतर्गत भारतातील सर्वात मोठं एमआरओ केंद्र (Maintenance, Repair, Overhaul) उभारलं जाणार आहे. पहिल्या टप्प्यात ५ लाख मेट्रिक टन वार्षिक मालवाहतूक क्षमतेसह हे केंद्र कार्यान्वित केलं जाईल. अंतिम टप्पा सुरू होईल तेव्हा येथून वार्षिक ३२ लाख मेट्रिक टन मालवाहतूक होईल.

७. अत्याधुनिक लॅन्डिंग सिस्टिम

या विमानतळावर Category II Instrument Landing System बसवण्यात आली आहे, ज्यामुळे केवळ ३०० मीटरपर्यंतची दृश्यमानता असली तरी सुरक्षित लॅन्डिंग होऊ शकतं. दाट धुकं अथवा पावसाळ्यात ही सिस्टिम उपयोगी पडेल. मुंबई विमानतळावर लॅन्डिंगसाठी ५५० मीटरपर्यंतची दृश्यमानता लागते.

८. ६४ टक्के GenZ व मिलेनियल्स प्रवासी


विमानतळ प्रशासनाने सांगितलं की सध्या भारतात विमान प्रवास करणाऱ्या प्रवाशांपैकी ६४ टक्के प्रवासी हे GenZ व मिलेनियल्स पिढीतले आहेत. ही पिढी 'डिजीयात्रा'चा पर्याय निवडून बोर्डिंगदरम्यानचा वेळ वाचवते, रांगेत उभं राहणं टाळते. त्यामुळे आम्ही अत्याधुनिक व सुरक्षित अशी डिजीयात्रा सुविधा कार्यान्वित केली आहे. ज्यामुळे इमिग्रेनशनच्या रांगांपासून प्रवाशांची सुटका होईल. गेटबाहेर कमी रांगा दिसतील.

९. फूड कोर्टऐवजी फूड हॉलची संकल्पना

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर फूड कोर्टऐवजी फूड हॉल ही संकल्पना आहे. प्रवाशांना वेगवेगळ्या काउंटरवर जाण्याची आवश्यकता भासणार नाही. त्याऐवजी ते एकाच वेळी अनेक आउटलेटवरून प्री-ऑर्डर करू शकतात आणि त्यांना एकत्रितपणे त्याची डिलिव्हरी मिळेल. Wagamama, Coco Café, Bombay Bond, KFC, Bombay Brasserie, Bayroute, Foo सारखे फूड आउटलेट्स येथे उपलब्ध असतील. मॉलमधील फूड एरिया प्रमाणे या विमानतळावर फूड हॉल असेल. म्हणजे मध्ये बसण्याची व्यवस्था आणि चारही बाजूला फूड आउटलेट्स. तसेच विमानतळाच्या ॲपद्वारे बोर्डिंग गेटवर ऑनलाइन फूड ऑर्डर करता येईल.

१०.विमानतळावर स्वागतासाठी डिजिटल कलाकृती

विमानतळावर ठिकठिकाणी भव्य आणि आकर्षक डिजिटल कलाकृती पाहायला मिळतील. डिपार्चर (निर्गमन) गेटवर सात गोलाकार एलईडी स्क्रीन्स बसवण्यात आल्या आहेत. तसेच आत आणखी दोन डिस्प्ले असतील.



# वाटूळ येथील शिव प्रतिष्ठान व यंगस्टार तांबळवाडी आयोजित कब्बडी स्पर्धेत दत्त माऊली जुवाठी विजेता तर उपविजेता ठरला तळवडे नवलाई संघ

**दैनिक युवक आधार**
**राजापूर:-(प्रमोद तरळ)**

शिवप्रतिष्ठान वाटूळ व यंगस्टार तांबळवाडी वाटूळ यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक खेळाडूंसाठी आयोजित करण्यात आलेल्या कबड्डी स्पर्धेत ६ संघांनी सहभाग घेतला होता. दिवसभर रंगलेल्या या स्पर्धेत सर्व संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. अंतिम सामन्यात दत्त माऊली जुवाठी संघाने विजेतेपद तर उपविजेतेपद तळवडे नवलाई संघाने पटकावले तृतीय क्रमांक उपविजेतेपद शिवभक्त वाटूळ तांबळवाडी संघाने पटकावले विजेत्या सर्व संघांना आकर्षक चषक व पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन शिवप्रतिष्ठानचे अध्यक्ष सुहास. चव्हाण व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेसाठी प्रथम क्रमांकाचे चषक श्री सिद्धेश रमेश चव्हाण, द्वितीय क्रमांकाचा चषक कु. अक्षय हरिश्चंद्र चव्हाण, तृतीय



क्रमांकाचा चषक कु.अजराज प्रल्हाद चव्हाण, उत्कृष्ट चढाईचा चषक श्री सुनिल सुरेश चव्हाण, उत्कृष्ट पकडचा चषक प्रथमेश सुभाष चव्हाण, अष्टपैलू खेळाडूचा चषक श्री जनार्दन रामचंद्र चव्हाण यांच्या मार्फत देण्यात आला. प्रथम क्रमांकाचे पारितोषिक शिवप्रतिष्ठान वाटूळ, द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक श्री बाळकृष्ण महादेव वळंजू, तृतीय क्रमांकाचे पारितोषिक हा.भ.प. नंदकुमार वासुदेव चव्हाण यांच्या कडून देण्यात आले. उत्कृष्ट चढाई साहिल मोरे तळवडे, उत्कृष्ट पकड स्वयंम बाणे जुवाठी, अष्टपैलू हर्षद बाणे जुवाठी यांना देऊन गौरविण्यात आले.महेश गुरव व सर्व पंच टिमचे यावेळी आभार मानण्यात आले. या कार्यक्रमाला शिवप्रतिष्ठान वाटूळ श्री सुहास चव्हाण, श्री प्रशांत (दादा) चव्हाण, श्री कृष्णा चव्हाण. श्री विराज चव्हाण, श्री बाळकृष्ण वळंजू, श्री सुशिल चव्हाण, श्री प्रमोद चव्हाण, श्री प्रथमेश चव्हाण, श्री जनार्दन चव्हाण, प्रल्हाद चव्हाण, श्री गणेश चव्हाण, श्री रघुनाथ चव्हाण,कु. अक्षय हरिश्चंद्र चव्हाण, श्री सिध्दार्थ चव्हाण, श्री देवेंद्र चव्हाण, श्री विद्याधर चव्हाण, पत्रकार श्री प्रकाश वळंजू यांचे सहकार्य लाभले. या स्पर्धेसाठी मैदान उपलब्ध करून दिल्याबद्दल विद्या विकास मंडळ मुंबई, आदर्श विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स वाटूळ प्राचार्य श्री संदिप मयेकर सर व सर्व शिक्षक वर्ग यांचे आभार मानण्यात आले. विशेष सहकार्य शिवप्रतिष्ठान वाटूळ व यंगस्टार तांबळवाडी यांचे लाभले. या स्पर्धेचे आयोजन अजराज प्रल्हाद चव्हाण, वेदांत कृष्णा चव्हाण, अरमान बाळकृष्ण वळंजू, ओमकार संजय चंदूरकर, सुयश संतोष चव्हाण, आयान कासम लांजेकर, सादिक हसन लांजेकर, यज्ञेश बापार्डेकर यांनी केले यावेळी शिवप्रतिष्ठान अध्यक्ष सुहास चव्हाण, प्रशांत (दादा) चव्हाण, सोसायटीचे चेअरमन कृष्णा चव्हाण, प्राचार्य श्री संदिप एकनाथ मयेकर सर,आनंद त्रिपाठी, धनंजय हजारे व शिक्षक वर्ग जनार्दन चव्हाण, विराज चव्हाण,संजय चव्हाण, संतोष भुर्के, ओमकार चव्हाण, सुहास चव्हाण, वेदांत चव्हाण, अजराज चव्हाण अरमान वळंजू, ओमकार चंदूरकर, सुयश चव्हाण, आयान लांजेकर, सादिक लांजेकर, यज्ञेश बापार्डेकर आदी उपस्थित होते

## आदिवासी समाजामध्ये इतर समाजाच्या घुसखोरी विरोधात व विविध समस्या संदर्भात नियोजन बैठक"

**दैनिक युवक आधार**
**गडचिरोली प्रतिनिधी प्रशांत पेदापल्लीवार**

भव्य महाआक्रोश मोर्चा काढण्याबाबत तारीख निश्चित झाल्याने धानोरा येथे सरपंच संजय गावडे यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन बैठक पार पडली.

दिनांक 15 ऑक्टोबर 2025 रोजी होणाऱ्या आदिवासी समाजाचा महाआक्रोश मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे धडकणार आहे. त्या पार्श्वभूमीवर धानोरा येथे तालुका सरपंच संघटनाच्या वतीने नियोजन आढावा बैठक घेण्यात आले.

या मोर्चा दरम्यान येणाऱ्या नागरिकांची कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी सुरक्षितता, वाहतूक व्यवस्थापन, आरोग्य सुविधा, स्वच्छता यांसह अन्य सर्व बाबींच्या संदर्भात काटेकोर नियोजन आणि अंमलबजावणी करण्याच्या संबंधित चर्चा करण्यात आली.

धानोरा तालुका सरपंच संघटनेच्या वतीने करता येईल त्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या मोर्चाला



सर्वांनी आपली जबाबदारी आहे असा समजून सर्व जबाबदाऱ्या आपण पार पाडू असे यावेळी व्यक्त केले.

इतरही समाजाचा प्रतिसाद मिळावा आणि मोर्चा सुरळीत पार पडावा यासाठी चर्चा करण्यात आले.यावेळी सरपंच संघटनेचे पुरुषोत्तम बावणे, संजय गावडे, प्रदीप उसेंडी, अनिल दडांजे, चेतन सुरपाम, शेवंता हलामी, मंगला करंगामी, रंजना सिडाम, मोनिका पुळो, नंदा दुगा, अश्विना मडावी, कमलेश मडावी, गणेश उईके, अंबिका पुंघाटी, पंकज तुलावी, रागिणी हिचामी, आदी उपस्थित होते.

## सीताबर्डी व्यापाऱ्यांनी मख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याबददल मानले आभार.

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग**

सिटाबर्डीतील व्यापारी समुदायासाठी दिलासा देणाऱ्या एका महत्वाच्या घटनाक्रमात, सिटाबर्डी मर्चट्स असोसिएशन (SMA) च्या प्रतिनिधीनी भाजपा महाराष्ट्र स्टेट बिझनेस अलायन्सचे अध्यक्ष श्रीविक्की कुकरेजा याच्या मार्गदर्शनाखाली, माननीय मुख्यमंत्री श्री देवेद्र फडणवीस यांची रविवार सायंकाळी रामगिरी, नागपूर येथे भेट घेतली, प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व SMA अध्यक्ष किशन (गुइड़) अग्रवाल आणि सचिव हुसैन एन. अजानि यांनी केले त्यांनी नागपूर महानगरपालिकेकडून आधीच नो हॉकिंग झोन म्हणून घोषित करण्यात केलेली सीताबर्डी मेन रोड हे कायम नो हॉकिंग झोन राहावे आणि त्याचे काटेकोरपणे पालन व्हावे यासाठी सविस्तर निवेदन सादर केले. प्रतिनिधी मंडळाने म्हटले की, दीपावली व लग्न हंगाम लक्षात घेता प्रत्येक दुकानधारकाने आपले व्यापारिक तयारी पूर्ण केली असून, हॉकर्समुळे कोणताही व्यत्यय निर्माण झाला, तर शहराच्या प्रमुख व्यापारी भागात मोठे नुकसान होऊ शकते, या बैठकीत श्री विक्की



कुकरेजा यांनी

स्वतः प्रतिनिधी मंडळासह उपस्थित राहून मुख्यमंत्री यांना व्यापाऱ्यांचे प्रश्न मांडले. सचिव हुसैन अजानि यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचेकौत्क करत त्यांनी सकारात्मक आश्वासन दिल्या बद्दलआभार मानले. तसेच, नागपूर महानगरपालिका आयुक्त श्री अभिजीत चौधरी आणि पोलीस कमिशनर श्री रवींदर सिंगल यांचेही सीताबर्डी येथील स्व्यवस्था राखण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतक त्यांनी केले.प्रतिनिधी मंडळात किशन (गुडूर) अग्रवाल (अध्यक्ष), हसैन एन. अजानि (सचिव), अर्जुन भोजवानी, किशन गांगवानी, जगदीश अरोरा, कैलाश छाबड़िया.

## लिहाखेडी येथे १२ ऑक्टोबर रोजी जिल्हास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** तालुक्यातील लिहाखेडी येथील कै. कडुबा पा. साखळे ग्रंथालय व छत्रपती बिगर शेती सहकारी पतसंस्था, लिहाखेडी ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीननगर यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञान संपन्न माहिती, समृध्द युवक व व्यक्तीमत्व विकास, भाषा साहित्य विकास या उद्देशाने जिल्हा स्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

दि.१२/१०/२०२५ रोजी रविवार सकाळी. ९ : ३० ते १०:३० पर्यंत ही परिक्षा असेल परिक्षेमध्ये अ गटात इयत्ता.५ ते १० वी वर्गातील विद्यार्थी या स्पर्धा मध्ये भाग घेवु शकतील व ब गटात इयत्ता ११ ते पदवी / पदव्युत्तर कोणत्याही शाखेतील विद्यार्थी भाग शकतील"अ "गट साठी प्रथम पारितोषीक 1500 रुपये (कै. काशिराम पा. साखळे यांच्या स्मृति प्रित्यर्थ),तृतियसंकोषीक ७५०/- रुपये (सामाजिक कार्यकर्ते श्री. कृष्णा विठ्ठल साखळे यांच्या तर्फे),द्वितीय पारितोषीक 1000 रुपये ( एकनाथ हिवाळे सरपंच मांडणा यांच्या तर्फे),चौथे पारितोषीक 500/- रुपये ( विनोद चव्हाण यांच्या तर्फे)"ब "गट साठी प्रथम पारितोषिक 1500 रुपये (डॉ. निलेश पा. मिरकर यांच्या तर्फे),तृतीय पारितोषिक ५००/- रुपये( युनिक करियर पॉईट सिल्लोड),द्वितीय पारितोषीक 1000 रुपये (कै. शुंगंधाताई काशिराम साखळे यांच्या स्मृति प्रित्यर्थ),चौथे पारितोषीक 500/- रुपये (छत्रपती बिगरशेती पतसंख्या लिहाखेडी),पाचवे पारितोषीक 500/- रुपये (कै.वसंतराव भाले यांच्या प्रित्यर्थ),पाचवे पारितोषीक 500/- रुपये डॉ. निलेश पा. मिरकर यांच्या तर्फे) असे राहणार असुन या साठी काही नियम व अटी असणार आहे.

१) प्रत्येक विद्यालय व उच्च माध्यामिक विद्यालयाचे विद्यार्थी भाग घेवु शकतील २) गुण संपन्न व ज्ञान संपन्न विद्यार्थी शाळेने निवड करून नावे स्पर्धत द्यावीत.

३) शाळेचे ओळख पत्र किवा पत्र आवश्यक आहे ४) पेपर हा मराठीत राहिल परिक्षेत बाकीचे माध्यमाचे विद्यार्थी भाग घेऊ शकतील.

५) सामान्य ज्ञान परिक्षेत शंभर गुण असतील. ६) ९० मार्कचे वस्तुनिष्ठ प्रश्न व १० मार्कचे एक निबंध असेल,

७) परिक्षा पारदर्शक व नियमानुसार असेल. ८) सर्व सहभागी विद्यार्थीना प्रमाणपत्र देण्यात येईल ९) परिक्षा एक तासांची असेल , परिक्षेचे ठिकाण जि. प. प्राथमिक शाळा लिहाखेडी येथे घेण्यात येणार आहे.

नियम व अटीचे अधिकार संयोजकाला व संचालक यांना असणार आहे.

स्पर्धेचकांचे नांवे व फीस प्रतीस्पर्धक (अ गट) ३० रुपये व (ब गट) ५० रुपये दि.१०/१०/२०२५ पर्यंत स्विकारली जात जाणार आहे.

द्यावी.या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा असे आवाहन आयोजक प्रा.शिवराम साखळे,

बिगर शेती सहकारी पतसंस्था सचिव अशोक पाटील साखळे, बाळाराम पाटील साखळे, नामदेवराव साखळे , दिलीप साखळे, विष्णु फरकाडे, बाळा बावस्कर, संतोष साखळे, राजु साखळे, सुनिल जैस्वाल, हरीदास साखळे यांनी केले आहे.

# सिल्लोडमध्ये सेना भवन येथे महर्षी वाल्मिकी जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** येथील आमदार अब्दुल सत्तार यांचे जनसंपर्क कार्यालय सेना भवन येथे महर्षी वाल्मिकी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्याहस्ते महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले .अब्दुल समीर यांनी यावेळी उपस्थितांशी संवाद साधत महर्षी वाल्मिकी जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल,शहरप्रमुख मनोज झंवर , महिला आघाडीच्या दुर्गाबाई पवार, कृउबा समितीचे संचालक शेख जावेद, माजी जि. प. सभापती राजाराम पाडळे, विठ्ठल



सपकाळ, माजी जि. प. सदस्य भिका वाघ, सेवानिवृत्त पीएसआय लक्ष्मण सोन्ने, राजेंद्र ठोंबरे, सयाजीराव वाघ, माजी नगरसेवक शेख सलीम हुसेन, प्रशांत क्षीरसागर, सत्तार हुसेन, आसिफ बागवान, राजू गौर,रामू सुरडकर, मानसिंग राजपूत, सुनील पांडुरंग दुधे, संदीप हाडोळे, भावराव दुधे, राजेंद्र साठे, प्रा. तपासे, शिवा टोम्पे, फहिम पठाण, जगन्नाथ कुदळ, डॉ. गणेश सपकाळ, कैलास सपकाळ, देविदास सपकाळ, रमेश सपकाळ, कचरू सपकाळ, कौतिक सपकाळ ,पुंजाराम सपकाळ, अमोल सपकाळ, हिम्मत सपकाळ ,मनोहर सपकाळ ,तसेच विकास सपकाळ ,गजानन सपकाळ ,सागर सपकाळ ,विष्णू सपकाळ, अजय सपकाळ, समाधान सपकाळ, शुभम सपकाळ, शालिक सपकाळ ,रणजीत सपकाळ ,स्वप्नील सपकाळ, तुषार सपकाळ ,केशव दांडगे ,संदीप सपकाळ, सतीश सपकाळ ,विष्णू दांडगे ,सतीश सपकाळ ,अमोल सपकाळ, प्रदीप सपकाळ, ईश्वर सपकाळ ,जितू सपकाळ, आनंद दांडगे, साहेबराव सपकाळ ,प्रदीप सपकाळ ,सुनील सपकाळ, अंकुश सपकाळ ,सतीश जाधव ,शुभम जाधव आदींची उपस्थिती होती.

# रमाई नगरमधील नागरिकांचा संताप — "एक बाजूची नाली आणि तुटलेल्या स्लॅबमुळे पाणी थेट रस्त्यावर!"

**दैनिक युवक आधार**
**लातूर प्रतिनिधी मोहम्मद पिंजारी**

रमाई नगर परिसरातील नागरिक गेल्या काही वर्षांपासून एकाच समस्येला कंटाळले आहेत. या भागातील मुख्य रस्ता जरी व्यवस्थित आणि चांगल्या अवस्थेत असला, तरी रस्त्याच्या उजव्या बाजूला असलेली नालीच नागरिकांसाठी मोठं संकट ठरली आहे.

नाली केवळ एका बाजूने करण्यात आल्याने पावसाचं पाणी मोकळेपणाने वाहू शकत नाही, परिणामी ते थेट रस्त्यावर साचतं. काही ठिकाणी ही नाली पूर्णपणे बुजून गेली असल्यामुळे पाण्याचा निचरा थांबतो आणि पाणी घरांसमोर, दुकानांसमोर सांडतं.

पावसाळ्यात तर परिस्थिती अधिक बिकट बनते. वारंवार ग्रामपंचायतीकडे तक्रारी करूनही



समस्या तशीच आहे. नागरिकांचा प्रश्न अगदी सरळ आहे – "रस्ता केला, पण पाण्याचा निचरा नाही केला, तर हा विकास कसला?"

दरम्यान, डॉ. छलाणी दवाखान्याच्या समोर असलेल्या पुलावरील स्लॅबला तडे गेल्याने तो तीन वर्षांपूर्वी तुटला, आणि आजवर त्याची दुरुस्तीही झालेली नाही. या स्लॅबवरून दररोज नागरिक, रुग्ण आणि वाहनांची सतत ये-जा होते, पण तुटलेल्या अवस्थेमुळे अनेक लहान-मोठे अपघात झाले आहेत. ग्रामपंचायतीने याकडे पूर्ण दुर्लक्ष केल्याचा नागरिकांचा आरोप आहे. "कागदावर काम दाखवून प्रत्यक्षात काहीच होत नाही," असा थेट आरोप रहिवाशांनी केला आहे. दवाखान्याजवळील हा भाग अतिशय वर्दळीचा असून, अशा धोकादायक परिस्थितीत प्रशासन अजूनही गप्प बसले आहे, हे धक्कादायकच आहे. लोक विचारतात – "एखादा मोठा अपघात झाल्यावरच का प्रशासन हलणार?" या निष्क्रियतेमुळे लोकांचा ग्रामपंचायतीवरील विश्वासच उडाल्याचे स्पष्ट दिसते.

नागरिकांनी आपल्या लिखित अर्जात मागणी केली आहे की, रमाई नगर भागातील पायऱ्यांच्या रस्त्यापासून ते डॉ. छलाणी दवाखान्यापर्यंतच्या रस्त्याच्या उजव्या बाजूस नवी, रुंद आणि दोन्ही बाजूंनी नाली करण्यात यावी तसेच तुटलेल्या स्लॅबची तातडीने दुरुस्ती करावी. गेली तीन वर्षे समस्या कायम असून, ग्रामपंचायतीने आता तरी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावं, अशी मागणी सर्वपक्षीय नागरिकांनी केली आहे.

अन्यथा नागरिकांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, या दुर्लक्षाविरोधात आंदोलन उभारले जाईल. "आम्ही शांत आहोत म्हणजे आम्हाला फरक पडत नाही असं नाही; पण आता संयम संपत चालला आहे," असं नागरिकांनी ठामपणे सांगितलं आहे. आता प्रशासनाने जनतेचा आवाज ऐकून तातडीने नाली व स्लॅबचं काम सुरू करावं, अन्यथा रमाई नगरचा रोष ग्रामपंचायत कार्यालयासमोर पेटून उठेल — हे नक्कीच!

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# तळा येथे धम्म चक्र प्रवर्तन दिनानिम्मित शालेय विद्यार्थांना शैक्षनिक साहित्य वाटप

## भारतीय बौद्ध महासभा तालुका तळा आणि तळा तालुका बहुजन सेवा संस्था (रजि.) रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने सम्राट अशोका विजयादशमी तथा धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी नितीन लोखंडे.**

तळा. ०२ ऑक्टोबर २०२५ रोजी भारतीय बौद्ध महासभा तालुका तळा आणि तळा तालुका बौद्धजन सेवा संस्था (रजि.) रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने तळा तालुका डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, तळा येथे सम्राट अशोका विजयादशमी तथा ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तळा तालुका बौद्धजन सेवा संस्थेचे माजी अध्यक्ष तसेच भारतीय बौद्ध महासभा रायगड जिल्हा दक्षिण विभागाचे माजी अध्यक्ष आयु. विजय सोनू जाधव हे होते. तर कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्षपदी तळा तालुका बौद्धजन सेवा संस्था चे विद्यमान अध्यक्ष आयु. हरिश्चंद्र माळी हे होते या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून तळा तहसील पुरवठा निरीक्षण अधिकारी आयु. नागेश शेगोकार हे उपस्थित होते.

धम्म चक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधत तळा तालुका बौद्धजन सेवा संस्था या संस्थेच्या वतीने प्रथमतः स्मारक परिसरात उपस्थितांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तदनंतर मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध आणि महामानव, बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुष्प पूजन, दीप पूजन आणि सुगंधी






पूजन करण्यात आले. तदनंतर भारतीय बौद्ध महासभेचे माजी अध्यक्ष आणि बौद्धाचार्य आयु. भीमराज जाधव तसेच माजी कार्यालयीन सचिव, बौद्धाचार्य आयु. केशव लोखंडे यांनी उपस्थित भीमानुयायी यांच्या समवेत बुद्ध पूजा पाठ संपन्न केला. यावेळी तथागत भगवान गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समता सैनिक दल आणि उपस्थित भीमानुयायी यांच्या वतीने मानवंदना देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारतीय बौद्ध महासभेचे माजी सरचिटणीस प्रकाश गायकवाड यांनी केले. यावेळेस उपरोक्त दोन्ही संस्थेच्या वतीने उपस्थित प्रमुख पाहुणे, भारतीय बौद्ध महासभेचे विद्यमान महिला व पुरुष जिल्हा पदाधिकारी तसेच उपस्थित मान्यवर सर्व गाव प्रमुख महिला व पुरुष यांचा पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. यानंतर प्रमुख पाहुण्यांचे व उपस्थितांचे मनोगत झाले. याप्रसंगी ज्यांचा समाजसेवेत तसेच स्मारक निर्मितीसाठी मोठे योगदान आहे असे सेवा संस्थेचे खजिनदार दिवंगत केशव लोखंडे यांना उपस्थितांच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

तळा तालुका बौद्धजन सेवा संस्था (रजि.) रायगड यांच्या वतीने सेवानिवृत्त कर्मचारी व भारतीय बौद्ध महासभेचे माजी कार्यालयीन सचिव केशव लोखंडे (कुडे) यांनी आपल्या मांदाड हायस्कूल येथील प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले, आयु दामोदर गावाने (रहाटाड )यांचा सेवानिवृत्ती निम्मित शाल, पुष्प, सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.तसेच आयु. महेंद्र गायकवाड (बामणघर) हे देखील सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांसह शाल , भेटवस्तू आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर तळा तालुक्यातील दहावी, बारावी पदवीधर तसेच विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या एकूण ४८ गुणवंतांचा सत्कार तळा तालुका बौद्धजन सेवा संस्थेच्या वतीने करण्यात आला. यामध्ये तळा येथील कुमारी जान्हवी रमेश साळवे हिने मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेमध्ये ९२.४०% गुण मिळवून तळा तालुक्यामध्ये प्रथम क्रमांक पटकावला. या विद्यार्थिनीच्या डोक्यावर वडिलांचे छत्र नसताना तसेच आई मोलमजुरी करून घरखर्च चालवत असताना तिने अथक मेहनत घेऊन हे यश संपादन केले आहे तसेच शेणवली येथील कुमार रोहन मिनाक्षी गायकवाड हा विद्यार्थी देखील गरीब कुटुंबातील असून त्याची आर्थिक परिस्थिती ही हालाखीची आहे असल्यामुळे या दोन्ही विद्यार्थ्यांना तळा तालुका बौद्धजन सेवा संस्थेने पुढील शिक्षणाकरिता दत्तक घेऊन त्यांचा दोन वर्षासाठीचा शैक्षणिक खर्चाचा भार उचलला आहे. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष आयु. विजय सोनू जाधव यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये भारतीय बौद्ध महासभेच्या कार्याचा तसेच सेवा संस्थेच्या कार्याचा आढावा घेत भविष्य देखील या दोन्ही संस्था हातात हात घालून काम करतील असा विश्वास व्यक्त केला. शेवटी सर्व उपस्थित भीम अनुयायी यांच्या वतीने सरणतय झाले. शेवटी आयु. केशव लोखंडे यांच्या दानातून उपस्थितांना भोजनदान करण्यात आले. या कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभेचे सर्व माजी पदाधिकारी तसेच तळा तालुका बौद्धजन सेवा संस्था (रजि) रायगड या संस्थेचे सर्व पदाधिकारी विशेषतः मुंबईकर बहुसंखेने उपस्थित होते. या वर्षामध्ये तळा तालुका बौद्धजन सेवा संस्था (रजि) रायगड संस्थेने वृक्षारोपण केले.त्या नंतर खांबवली आदिवासी वाडी येथील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप, तळा तालुक्यातील दोन विद्यार्थी दत्तक घेणे आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सत्कार समारंभ असे चार उपक्रम हाती घेतले आहेत याबद्दल सामाजिक स्तरातून सेवा संस्थेचे कौतुक होत आहे.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयु उत्तम लोखंडे यांनी केले तर आयु. दामोदर गवाणे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

यावेळी कार्यक्रम करिता मोठ्या प्रमाणात भीम अनुयायी मुंबई वरून उपस्थित होते त्या मध्ये प्रामुख्याने, धर्मा लोखंडे, आनंद माळी, सुनील शिंदे, के. डी.तांबे ,नरेंद्र तांबे,राजू नाकते ,मंगेश नाकते , अशोक गायकवाड, प्रकाश शिंदे, अंकुश माळी, रवी गवाने, प्रफुल गवाने ,रोशनी लोखंडे, दर्शना लोखंडे, ऍड प्रियंका माळी, हर्षली माळी, यशवंत जगताप,पांडुरंग माळी, मनोहर गायकवाड, पांडुरंग लोखंडे, रामदास लोखंडे, भिकू शिंदे,कानू गायकवाड, भिकू शिंदे, बाळाराम लोखंडे, रामदास नाकते, भिमराव पवार, हेमंत गायकवाड, चिंतामण नाकते, दयानंद जानराव, महेंद्र गायकवाड, सिद्धार्थ गायकवाड, अशोक मोरे, शुभांगी साळवे, रेश्मा साळवे, शारदा नाकते, मीनाक्षी गवाने, सारिका नाकते, मिनल लोखंडे, साक्षी गायकवाड, समृर्ती शिंदे, लक्ष्मण लोखंडे, आदी उपस्थित होते.

# नावात ' राम ' तसे कर्तृत्ववान, ठाणेदार ' रामेश्वर चव्हाण '

## रिसोड पोलीसांचा रुबाब खास, अवघ्या सहा तासात चोरीचा तपास.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

**वाशिम :** जिल्हा पोलीस दलातील सिंघम ठाणेदार, गुन्हेगारांचे कर्दनकाळ एक धाडसी, कर्तव्यदक्ष आणि गुन्हेगारांवर वचक बसवणारे रिसोड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण हे नाव त्यांच्या कर्तृत्वाने जिल्हाभर झळकत आहे. रिसोड पोलीस स्टेशनचा पदभार स्वीकारल्यानंतर वरिष्ठांच्या मार्गदर्शनात आणि आपल्या सहकाऱ्यांच्या साथीने अल्पावधीतच त्यांनी गुन्हेगारी जगतावर जरब बसविला आहे. अनेक किचकट गुन्ह्यांचा जलद गतीने तपास करत गुन्हेगार व त्यांच्या सूत्रधारांना गजाआड केले आहे. तोच सिलसिला आजही कायम असून काल दि.४ आक्टोंबर रोजी झालेल्या दुचाकी चोरीचा अवघ्या सहा तासात छडा लावून आरोपीसह चोरी गेलेली दुचाकी ताब्यात घेतली आहे. त्यांच्या या कर्तव्यातील सातत्याने नावात ' राम ' तसे कर्तृत्ववान ठाणेदार चव्हाण अशी कौतुकाची थाप सर्व सामान्य जनतेकडून दिली जात आहे. अत्यंत धडाडीने




आणि नियमांचे पालन करून गुन्हेगारांना कायद्याच्या चौकटीत आणणारे रिसोडचे पोलीस आजमितीस सामान्य जनतेच्या मनात खरे " हिरो " ठरत आहेत.

रिसोड शहरातील महाराष्ट्र बँकेसमोरून दिनांक ४ ऑक्टोबर रोजी दुपारी मोटरसायकल चोरीची घटना घडली असता, रिसोड पोलिसांनी सर्व तांत्रिक बाबींचा वेगाने तपास करत अवघ्या सहा तासातच आरोपीसह मोटरसायकल ताब्यात घेतल्याची विशेष कामगिरी केली आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्या येत असलेले शेगाव खोडके येथील संदेश गजानन नरवाडे हे ४ ऑक्टोबर रोजी दुपारी काही कामानिमित्ताने रिसोड येथे आले होते. त्यांनी आपली दुचाकी एम एच २० एक्स ११२७ हिरो होंडा स्प्लेंडर बँकेसमोर उभी केली होती. मात्र, जेव्हा ते आपले काम आटपून आले असता त्यांना आपली दुचाकी त्या ठिकाणी दिसली नाही. त्यांनी काही वेळ इतरत्र आपल्या दुचाकीचा शोध घेतला.परंतु दुचाकीचा शोध लागला नाही.यावरून खोडके यांनी थेट रिसोड पोलीस स्टेशन गाठले आणि आपली फिर्याद नोंदवली. सदर प्रकरणात गांभीर्याने लक्ष देत ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनात रिसोड पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सदर ठिकाणी पाहणी केली.अन्य तांत्रिक बाबीचा बारकाईने तपास करून अखेर सहा तासातच अशोक दिलीप कांबळे वय ४२ वर्षे राहणार जिजाऊ नगर रिसोड यास ताब्यात घेतले. आरोपीने सदर मोटरसायकल चोरी केल्याची कबुलीही दिली. याप्रकरणी रिसोड पोलिसांनी कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करत आरोपीला अटक करून न्यायालयात हजर केले. आरोपीकडून ताब्यात घेतलेल्या दुचाकीची किंमत २० हजार रुपये असून सदर कार्यवाही जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, अपर पोलीस अधीक्षक लता फड,सहायक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांचे नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले, पोलीस हवालदार रमेश गोडघासे, प्रशांत राजगुरू, पोलीस अमलदार परमेश्वर भोणे, विनोद घनवट, रवी आढागळे, सुनील तिवाले, ठाकरे यांनी केली आहे. रिसोड पोलीसांची ही कौतुकास्पद कामगीरी सामान्य जनतेला दिलासा देणारी असून, गुन्हेगारांवर वचक निर्माण करणारी ठरत असल्याचे बोलले जात आहे.

# ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी घेतली आत्महत्या केलेल्या विद्यार्थिनी दिवंगत अनुष्का केळवेच्या घरच्यांची भेट



**दैनिक युवक आधार**
**रमेश राऊत**

ऐरोली(नवी मुंबई)ऐरोलीतील सुशीला देवी (एस डी वी.) शाळेत दि.३ ऑक्टोबर २०२५ रोजी दहावी च्या सराव परीक्षेत शेजारच्या विद्यार्थ्यांने दिवंगत अनुष्का शहाजी केवळे या विद्यार्थींनी जवळ कोणीतरी कागदाचा गोळा फेकल्याने कॉपी केल्याच्या आरोपावरून शिक्षकांकडून अपमानास्पद वागणूक दिल्यामुळे अनुष्काने गळाफास घेऊन जीवन संपविल्याची दुर्दैवी घटना रबाळे नोसीलनाका येथे घडली आणि केवळे कुटुंबीयांवर ऐन सणासुदीच्या काळात दुखाचा डोंगर कोसळला आहे. या.घटनेची माहिती बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा बाळासाहेब तथा डॉ.प्रकाश आंबेडकर यांना कार्यकर्त्यांकडून कळताच दि.६ ऑक्टोबर २०२५ रोजी वाशीतील कामगार मेळाव्यास आलेल्या ॲड.प्रकाश आंबेडकरांनी केळवे कुटुंबीयांची सांत्वन पर भेट घेतली व विचारपूस केली.यावेळी रिपब्लिकन सेनेचे माजी विधानसभा अध्यक्ष प्रकाश वानखेडे,युवा नेते सुनील वानखेडे आदीसह महिला पदाधिकारी, समतासैनिक,भारतीय बौद्ध महासभा व वंचितचे नवी मुंबई कामगार आघाडीचे कार्यकर्ते तसेच प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या घटनेमुळे एस. डी.वी.शाळेच्या कार्यपद्धतीवर बोट ठेवण्यात आले आहे.स्थानिक पोलीस प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेतली असून दोषींवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

# भूमिपुत्र च्या लढ्याला यश

## सरकारने काहीप्रमाणात शेतकऱ्यांचे अश्रु पुसले

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी. रणजीत सिंह ठाकुर**

"पीक कर्ज माफी आवश्यक होती".....वाशिम जिल्ह्या सह परिसरात मे महिन्या पासून सातत्याने अतिवृष्टी आणि सततच्या पावसाने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले होते. झालेल्या नुसकानीमुळे भागातील शेतकरी कोसळला होता. शेतकऱ्यांची उभी पिके हातातून गेल्यामुळे भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून शेतकऱ्यांच्या लढ्याला बळ देण्यासाठी 25 सप्टेंबरला रिसोड तहसील वर भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. मोर्चाच्या आधी सुद्धा अनेक वेळ राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, राज्याचे दुसरे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांना पीक नुकसानीची आणि कमी केलेली मदत वाढवून देण्या संदर्भात तथा सरकारने ओल्या दुष्काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे असल्याचे निवेदन देण्यात आले होते. वाशिम जिल्ह्यातील पहिला मोर्चा शेतकऱ्यांसाठी भूमिपुत्र कडून काढण्यात आला होता. भूमिपुत्र कडून सरकारला ज्या ज्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले होते, त्या सर्व मागण्या राज्य सरकारने आज पत्रकार परिषद घेऊन घोषित केल्या हे विशेष.

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापनाचे निकष बाजूला ठेवत सरकारने पीक नुस्कानीची मदत जाहीर केली. कोरडवाहू साठी आठहजार पाचशे हेक्टरी वरून 17500 करण्यात आली तर खरडून गेलेल्या जमिनीसाठी सुद्धा पहिल्यांदाच राज्य सरकारने मदतीची घोषणा केल्यामुळे ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या होत्या त्यानां मोबदला मिळण्याचा मार्ग



मोकळा झाला आहे. सरकारने 32 हजार कोटीची घोषणा केली परंतु महसूल विभागाने व कृषी विभागाने नुस्कानीचे सर्व्हे करत असतांना अनेक चुका केलेल्या आहेत. त्यामुळे अंमल बजावणी करतांना शेतकऱ्यांनां त्याचा फटका बसू शकतो.

सरकारने हे सर्व करत असतांना पीक नुसकान मान्य केले परंतु पीक कर्ज माफी मात्र केली नाही त्यामुळे शेतकरी कर्जबाजारीच राहणार असल्याची प्रतिक्रिया भूमिपुत्रचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी दिली.

# अँड.महेश बेदरे यांच्या घरी रेणुका माता पूजन व जागरण गोंधळ सोहळा उत्साहात संपन्न...

## ज्येष्ठ नेते देविदास आबा धस यांच्यासह संत, महंत आणि मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा(प्रतिनिधी)** पाटोदा येथील पत्रकार तसेच आमदार सुरेश आण्णा धस यांचे पाटोदा तालुका प्रसिद्धीप्रमुख, मीडिया चीफ पी.आर.ओ. अँड.महेश बेदरे यांच्या निवासस्थानी सोमवार, दिनांक ६ ऑक्टोबर-२०२५ रोजी रेणुका माता पूजन व जागरण गोंधळाचा सोहळा मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात संपन्न झाला. या पवित्र कार्यक्रमाला महंत राधाताई महाराज(आईसाहेब), ज्येष्ठ नेते देविदास आबा धस, आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे, नगराध्यक्षा दिपालीताई राजूभैय्या जाधव, उपनगराध्यक्ष रोहिदास गीते, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किरण शिंदे पाटील, तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांच्या सह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. देवीच्या जयघोषात जागरणाचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला. या प्रसंगी ज्येष्ठ नेते देविदास आबा धस यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या तसेच भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राजेंद्र गोरे, प्रदीप काका जाधव, माजी सभापती आनंद जाधव, भाजप तालुकाध्यक्ष भागवत येवले, पाटोदा वकील संघाचे माजी अध्यक्ष ऍडव्होकेट सुशील कोठेकर, वकील संघाचे विधीज्ञ ऍडव्होकेट सचिन जावळे, ऍडव्होकेट बी.डी. तळेकर, ऍडव्होकेट यू.बी.जाधव, काँग्रेस तालुकाध्यक्ष राहुल जाधव, ऍडव्होकेट विशाल मस्के, तुषार जाधव, पत्रकार सुधीर एकबोटे, ऍडव्होकेट श्वेताताई कराड राख, भाजप महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष सुवर्णा ताई



लांबरुड, काकासाहेब लांबरुड, आमदार सुरेश आण्णा धस यांचे मुंबई सहाय्यक सुशील ढोले, नगर पंचायत सभापती किशोर आडागळे, जनसेवक राजूभैय्या जाधव, सभापती रामेश्वर गोरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गणेश कवडे, नगरसेवक उमर चाऊस, नगरसेवक श्रीहरी गीते पाटील, पंचायत समिती सदस्य महेंद्र नागरगोजे, नगर पंचायत गटनेते बळीराम पोटे, महावितरणचे अभियंता आदेश कदम, नगरसेवक सुनील वाघमारे, सेवा सोसायटी संचालक सय्यद सज्जाद, पत्रकार अजीज शेख, पोपट कोल्हे, विजय जाधव, अनिल गायकवाड, हरिदास शेलार, बबन पवार, विजय जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे युवा नेते शिवराज पाटील जाधव, ब्राह्मण महासंघ तालुकाध्यक्ष प्रशांत देशमुख, अमोल जोशी, गणेश पांडव, महेश पांडव, अनिल पांडव, उदय देशमुख, विशाल देशमुख, नाना देशमुख, किशोर देशमुख, माजी नगरसेवक सतीश घोलप, संदीप जावळे, दिपक कांबळे, श्रीपाद जोशी, शाहू रंधवे, जय भवानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कदम, प्राध्यापक लोखंडे, प्रियदर्शनी विद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन कोल्हे, नवनाथ ढाकणे, भामेश्वर विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक एल. आर.जाधव सर, परजणे, रामदास निगुळे, बंडू तरटे गोंधळी, पत्रकार गोकुळ सानप, पत्रकार महेशर शेख, नाभिक महासंघ तालुकाध्यक्ष जितेंद्र सांगळे, गणप्रमुख अंगद सांगळे, जितेंद्र भोसले, गटशिक्षणाधिकारी धनंजय बोंदार्डे, महसूल कर्मचारी होळकर, भालेकर, स्वामी, सानप, शिवाजी गर्जे, बीड येथील ऍडव्होकेट संज्योत महाजन, रेणुका माता संस्थान अध्यक्ष अभिजीत वैद्य, रघुनाथ पांडव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.नरेश कासट, राहुल देशमुख, गणेश खिस्ते, संपत मुळे पाटील, नगर पंचायत अभियंता राहुल टाळके, महेश भाकरे, व्यापारी संघाचे अमोल जोशी तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, विभागीय अधिकारी, वकील बांधव, डॉक्टर्स, पोलीस बांधव, पत्रकार बांधव, स्नेही मित्र परिवार, नातेवाईक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी सर्व मान्यवरांचे स्वागत अँड.महेश बेदरे आणि सौ.शिल्पा महेश बेदरे यांनी बेदरे परिवाराच्या वतीने केले. या कार्यक्रमाने भक्ती, सामाजिक ऐक्य आणि परंपरेचा सुंदर संगम साधत परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण केले.

आमदार सुरेश आण्णा धस यांनी दूरध्वनीद्वारे अँड. महेश बेदरे आणि त्यांच्या परिवाराला रेणुका माता पूजन व जागरण गोंधळ सोहळयाबद्दल मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या त्याच प्रमाणे महानंदाच्या संचालिका प्राजक्ता काकू धस युवा नेते जयदत्त भैय्या धस, सागर आप्पा धस यांनी देखील दूरध्वनीवरून बेदरे परिवाराला शुभेच्छा दिल्या.

# डोंगराळ भागातील मासे पकडण्याची खडानं पध्दती

**साग सादड्याचा वासा**
**बांधू बेंदूर वाखानं**
**धोळ पाण्याचा पाहून**
**आंम्ही धरतू खडानं**

**नितळ गढूळ पाण्यात**
**जाई खडानं झाकून**
**भोतडी साटाला मांडीतो**
**पाय पाण्यात रोवून**

**मळ्या मुरवा कोकील**
**येती पाण्याच्या प्रवाही**
**आत फसला खेकडा**
**वाट पळण्याची पाही**

**आंम्ही लेकरं लेकरं**
**रानावनाची पाखरं**
**मासे भाकर खाऊन**
**देतो खुशीत ढेकरं**



आदिवासी कवी काळुदास कनोजे यांची ही खडानं कविता डोंगराळ भागातील आदिवासी बांधवांचे दरिद्रीमय जीवन आणि जुन्या मासेमारीची खडानं पध्दती रूढी परंपरा विषयी प्रकाश टाकत आहे.

अतिदुर्गम आदिवासी भागातील शेतकरी कष्टकरी बांधव हे पूर्वीपासून डोंगराळ भागात, दरीखोरीत निसर्गाच्या सानिध्यात राहत असल्याने त्यांनी जुन्या चालीरीती आणि रूढी परंपरा, शब्द संग्रह अजूनही टिकून ठेवल्या आहेत. आदिवासींची मासे पकडण्यासाठी 'खडानं' ही जुनी पद्धत आहे. आदिवासी डोंगराळ भागात पावसाळ्यात जास्त पाऊस पडल्यानंतर अनेक नदी (नय) नाले, ओढा(वहळ) झरी,डोह (दहाड) दिवाळीपर्यंत पाणी पाझरून वाहात असते. ह्या वाहत जाणाऱ्या पाण्याच्या प्रवाहात अनेक प्रकारचे लहान,लहान मासे,काळी,धवळी खेकड आढळतात. त्याचा आदिवासी भागातील लोकांच्या आहारात मांसाहारी पदार्थ म्हणून समावेश आहे. आदिवासी भागात जुलै, ऑगस्ट महिन्यापासून नदीला पूर आला की मासे डोळ सोडतात ओहळाचे, झरीचे नंतर शुद्ध (नितळ) पाणी कमी होते. मग खडकाळ उतारावर दगडांचा बांध पाण्याचा प्रवाह (धोळ) फेदराने लिपलेला शेवाळाने चिकण खडक पाहून खडान मांडण्याची फार जुनी पद्धत आहे.साग सादड्याचा वाशाला (उमेडा) बेंदूर,किंवा धामणीच्या झाडाच्या साल (वाख) काढून बांबूच्या किंबी किंवा कोडईच्या झुरडांच्या फांद्या दोन्ही बाजूला बांधून वरती लव्हाळ (गुंदणी) बांबूचा साट विणून साटाखाली गवत पसरून पुढे पाण्याचा साचलेला डोह,तळी (चोंढ) यात माशांची रहाळी असते त्यामुळे पाण्याच्या उतरत्या झोतीला (लहान प्रवाह) अलगद भोतडी मांडतात भोतडी भोवती सागची पानं दाबून धरत भोतडीतून मासे बाहेर पडू नये म्हणून सीबा ठेवतात भोतडी संध्याकाळी मांडतात. मासे रात्रभर थोडे,थोडे उतरतात व भोतडीत साचतात सकाळ उठल्यानंतर लोक नदीला, ओहळाला , झरीला जाऊन भोतडीतील मासे काढतात (खोडतात) सकाळच्या न्याहारीसाठी कालवण बनवतात. सर्वपित्री अमावस्येला मृत व्यक्तीच्या नावाने चुलीत अगारी पाडतात आदिवासी भागात माशांना वेगवेगळे शब्द आहेत. चिचनका ,मुरा ,डोख ,मळ्या ,दांडवन ,फुलकुट, कोकिल ( झिंग्या)( हा शब्द सगळीकडे वापरतात "वहळाचे आखडील ढोंगी डोशी चहड" अशी म्हण आजही प्रसिद्ध आहे),वादा ( सुरळी),खेकडा ( खीराडी) अशी जुनी नाव आजही प्रसिद्ध आहेत ओहळाचा अलग छोटा प्रवाह म्हणजे नरा, उपसा करणे (आटवणे), तळ्यातील खाच खळगे (मुरखुंड) मासे पकडण्यासाठी साधणे गरी, लोखंडी गळ,मळी,मळा( खेकडे पकडणे) भोतडी,उदान,खडान,पेंढी दाबणे,भाळी,(नदीची मासे पकडायला) वरी,कंडाळा ( मोठे मासे पकडायला) सादड्याची साल,गांडा बाभुळीचे वाळलेले बी कुटून टाकल्यावर मासे माजतात मग पकडतात,भरलेल्या पाण्यात मासे पकडणे (चाफणे) पाण्यातील गाळ ( गादा) असे शब्द आदिवासी भागात आजही वापरले जातात.

**- श्री. सुभाष कामडी .**
**(संशोधक)**

---

# श्री.तुळजाभवानी मंदिरास खुर्च्या भेट



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड:-** शहरातील जाकेर हूसैन नगर येथील श्री.तुळजाभवानी मंदिरास टिळकनगर मित्र मंडळाच्या वतीने भाविकांना बसण्यासाठी खुर्च्या भेट देण्यात आल्या विजय पाटील, प्रभाकर खोडके,सतिष सावळे, जीवन सोनवणे, काकासाहेब वाढेकर ,गजानन जाधव, जगदीश झवर, किशोर वाघ, राहुल गोरे, शुभम पंडित, चंदन कासार, शशिकांत पाचपांडे, आकाश ठाकुर, पिटर इंगळे यांचे मंदिर कमिटीच्या वतीने आभार मानून समाधान व्यक्त केले व भाविकांनी सढळ हाताने मदत करावी असे आवाहन करण्यात आले. आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाचं काहीतरी देणं लागतो या सामाजिक भावनेतून आज टिळक नगर मित्र मंडळाच्या वतीने श्री तुळजाभवानी मंदिर जाकीर हुसेन नगर सिल्लोड येथे तुळजाभवानी मातेच्या चरणी खुर्च्या अर्पण करण्यात आल्या.

# दादर येथील श्री छत्रपती शिवाजी मंदिर मधील कोकण व्हिजन २०२५ ला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**मुंबई:-(प्रमोद तरळ)**

आपला सर्वांच्या साक्षीने नुकताच श्री छत्रपती शिवाजी मंदिर दादर येथे 'कोकण व्हिजन २०२५' मा श्री नितीन बानुगडे पाटील सर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते हा उपक्रम तुडुंब गर्दीत हाऊसफुलच्या सोहळयात संपन्न झाला.या कार्यक्रमाला सारे वेळात वेळ काढून उपस्थित राहिले त्यासाठी आमच्या दोन्ही संघटनेच्या वतीने आपले सर्वांचे आभार मानण्यात आले

आता पर्यंत कोकण कर संघटनेने अनेक उपक्रम मुंबई रंगमंचावरती सादर केले. नाटक नमन पेक्षा ही हा वेगळा उपक्रम राबवण्यात वेगळीच ऊर्जा होती.. वेगळाच आनंद होता.अवघे दहा दिवसात हा उपक्रम राबवणे आमच्यासाठी तारेवरची कसरत होती. एवढ्या कमी वेळात एवढ मोठा उपक्रम सादर करणे ही जोखीम महाराजांचा आशीर्वादाने मोहीम अगदी उत्स्फूर्त प्रतिसादामध्ये झाली.. साक्षात महाराजांचा आशीर्वाद संघटनेच्या पाठी होता त्यामुळे या कार्याला अधिक गती मिळाली..असा उपक्रम क्वचित कधी तरी होतो आणि हे कार्य आमच्या दोन्ही संघटनेच्या माध्यमातून झाले याचे आज सार्थकी लाभले..आज धन्य झालो.. कुठे तरी आम्ही कोकणकर संघटनेचे कार्य आज वेगळ्या उंचीवर गेले याचे सर्व श्रेय आमच्या कामावर आमच्या संघटनेवर अतोनात प्रेम करत असलेल्या रसिक राजाचे आहे शिव भक्तांचे आहे ,आम्ही कोकण कर चाहते वर्गाचे आहे. आपण जो विश्वास आमच्यावर वेळा वेळी ठेवत आलात त्यामुळे नाट्यगृहात तुफान गर्दी झाली.१० दिवसात एवढा मोठा प्रेक्षक वर्ग रंगभूमीकडे खेचून आणणे खुप मोठा टास्क होता.पण आपल्या सर्वांच्या सहकार्यमुळे शक्य झाले.. हा उपक्रम राबवण्याचा मुख्य कारण आपले गडकिल्ले संवर्धन होणे काळाची गरज आहे आपला महाराजांचा खरा इतिहास आपल्या तरुण पिढीला कळावा हाच ध्येय होत..आणि ते आज पूर्ण झालं..सर्व शिव भक्तांना आम्ही आव्हान करतोय २५ ऑक्टोबर व २६ ऑक्टोबर २०२५ रोजी दोन दिवसाचे संगमेश्वर येथे प्रचिती गड संवर्धन (श्रमदान) मोहीम आम्ही हाती घेतली आहे तरी या मोहिमेत आपण सारे नक्की सहभागी व्हावे या उपक्रमाला सढळ हस्ते आर्थिक, वस्तू स्वरूपात, हातभार लावू शकता.

अधिक माहिती साठी कृष्णा येद्रे 9773142819 या नंबर कॉल करावा.आपण उपरोक्त उपक्रमाला प्रतिसाद द्यावा असे आवाहन आम्ही कोकणकर संघटना आणि संगमरत्न फाउंडेशन यांच्या वतीने करण्यात आले आहे तसेच पुन्हा एकदा दोन्ही संघटनेच्या वतीने कार्यक्रमाला आलेले प्रमुख अतिथी, प्रमुख पाहुणे, सहकार्य करणारे दानशूर व्यक्ती..आपल्या सर्वांमुळेच हा उपक्रम इतिहासाच्या पानावर सुवर्ण अक्षरांनी लिहिला गेला. या सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले आहेत.



---

## घनसावंगी आयटीआयत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते अभासी पद्धतीने अल्पकालीन अभ्यासक्रमांचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**कार्यकारी संपादक:प्रा. जगन्नाथ रासवे**

**घनसावंगी :** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नवनिर्मिती विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या “अल्पकालीन रोजगारक्षम प्रशिक्षण कार्यक्रम (STEP)” अंतर्गत विविध कौशल्यआधारित अभ्यासक्रमांचा शुभारंभ देशाचे पंतप्रधान मा. श्री नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते दुरस्त पद्धतीने (व्हर्च्युअल माध्यमातून) होत आहे.

या निमित्ताने डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, घनसावंगी येथे थेट प्रसारणाची व्यवस्था करण्यात आली असून, या कार्यक्रमासाठी स्थानिक जनप्रतिनिधी, उद्योजक, विद्यार्थी व नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

याप्रसंगी संस्था व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री सुनीलभाई रायठठ्ठा, सदस्य प्रा चत्रभूजनाना गोडबोले, चंद्रकांत भालशंकर व इंजी. आशिष मापारी यांची उपस्थिती राहणार आहे .

या कार्यक्रमाद्वारे युवकांना कौशल्य विकास, रोजगार संधी आणि स्वावलंबनाकडे नेणारा नवा मार्ग उपलब्ध होणार आहे.

कार्यक्रमाचे आयोजन व्यवस्थित होण्यासाठी संस्थेमध्ये विशेष तयारी करण्यात आली आहे .



दिनांक: ८ ऑक्टोबर २०२५
वेळ: दुपारी ३.३० वा.
स्थळ: डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, घनसावंगी

संस्थेचे प्राचार्य श्री. राजेश धानोरकर यांनी सांगितले की, “या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उद्योगस्नेही प्रशिक्षण घेऊन स्वावलंबी होण्याची नवी संधी मिळणार आहे.”

## सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर भर कोर्टात झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेध तसेच आरोपी वकिलावर कठोर करा- डॉ बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरम

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा -** दि. ६ ऑक्टोबर 2025 ला सुनावणी दरम्यान भारताचे 52 वे सरन्यायाधीश माननीय भूषण गवई यांचे कोर्ट नंबर वन मध्ये राकेश किशोर नावाच्या वकिलाने सरन्यायाधीशांच्या दिशेने बूट फेकण्याचा प्रयत्न केला ही अत्यंत निंदनीय घटना या घटनेचा डॉ बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरम निषेध करते. न्यायालयात सुनावणी सुरू असताना वकील डेक्स जवळ गेला त्याने बूट काढून सरन्यायाधीशांच्या दिशाने फेकण्याचा प्रयत्न केला. तिथे उपस्थित असलेल्या सुरक्षारक्षकांनी आरोपी वकिलाला ताब्यात घेतले. सनातन का अपमान नही सहेगा हिंदुस्तान अशा प्रकारच्या घोषणा देत कोर्टात आरोपी वकिलाने गोंधळ घातला .भारताच्या स्वातंत्र्यानंतर 75 वर्षाच्या कालखंडात प्रथमताच भारताच्या सरन्यायाधीशांवर झालेल्या हल्ल्याची घटना म्हणजे सनातनी हिंदू ब्राह्मणांनी देशभरात मनवादी उच्छाद मांडल्याचे धोतक आहे. अशा देशद्रोही प्रवृत्तीचा निषेध करण्यात येत आहे.



बुद्धिस्ट समाजातील व्यक्ती देशाच्या सर्वोच्च पदावर विराजमान आहेत ही गोष्ट सनातनी आणि मनुवादी लोकांना पटतच नाही .कारण त्यांना न्यायव्यवस्थेत प्रशासनात किंवा सत्ता केंद्रात बौद्धांचे अस्तित्व सहन होत नाही .या संतापाच्या मुळाशी द्वेष नाही तर बौद्धांच्या प्रगतीबाबत असलेली असहिष्णुता आहे. हा हल्ला सरन्यायाधीशांवर नसून भारताच्या संविधान व लोकतंत्र यावर आहे. देशात धर्माचे राज्य नसून भारताच्या संविधानाने दिलेल्या कायद्याचे राज्य आहे .देशाचा कारभार हा संविधानाच्या माध्यमातून चालतो धर्माच्या नव्हे. धर्माच्या नावाने गुंड प्रवृत्ती माजवून हे कृत्य करणाऱ्या वकिलावर कठोर कारवाई करण्यात यावी . याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी भंडारा मार्फत महामहिम राष्ट्रपती द्रोपदी मुरमु, भारताचे पंतप्रधान मंत्री नरेंद्र मोदी, यांना एका निवेदन द्वारे जयप्रकाश भवसागर ,असित बागडे ,अरुण गोंडाने ,वाय एस देशभ्रतार ,सुदेश वैद्य ,बी एम गजभिये, एम डब्ल्यू दहिवले, आर एस रामटेके, अमृत बनसोड, डॉ रवींद्र वानखेडे ,हंसराज वैद्य, इंडियन प्रफुल ,डॉ प्रवीण थुलकर, एम यु मेश्राम, यांनी केलेली आहे.

---

# निराधारांच्या 150 संचिका तहसीलदार प्रतिभा गोरे यांना सुपुर्द....

**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना(अशोक ठोके)**

**परतूर -** मंठा मतदार संघाचे विद्यमान आमदार तथा माजी मंत्री बबनराव लोणीकर व राहुल भैया लोणीकर यांची प्रेरणा घेऊन सेवा पंधरवडा अंतर्गत

एकात्मिक सल्ला, समुपदेशन व चाचणी केंद्र ग्रामीण रुग्णालय परतूर अंतर्गत दुर्धरआजार ग्रस्त रुग्णांचे संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे प्रस्ताव तसेच दिव्यांग,विधवा,परितक्त्या, देवदासी आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा महिला व अनाथ मुले- मुली अशा तब्बल १५० संचिका तहसीलदार प्रतिभाताई गोरे यांना सुप्रुद करण्यात आल्या. या वेळी पद्माकर कवडे पाटील, ग्रामीण रुग्णालयाचे समुपदेशक शिवहरी डोळे , बंडू मानवतकर, मा.सरपंच माटे तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.



सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगड प्रणित कै. कुमार दीपक अरुण पाटकर यांच्या स्मरणार्थ रायगडची बेंचप्रेस स्पर्धा संपन्न"

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

रविवार दिनांक ०५/१०/२०२५ रोजी* *रायगडची जिल्हास्तरीय कै. कुमार दीपक सुरेखा अरुण पाटकर यांच्या स्मरणार्थ बेंचप्रेस स्पर्धा संपन्न झाली. सदर स्पर्धा समस्त पाटकर कुटुंबीयांनी पुरस्कृत केली होती.व्हि.के.हायस्कूल पनवेल येथे झालेल्या या स्पर्धेत महाड, खोपोली, पेण,पनवेल, कर्जत येथील अनेक खेळाडूंनी भाग घेतला होता. या स्पर्धेचे उदघाटन दैनिक युवक आधार चे संपादक, सामाजिक कार्यकर्ते, आणि अभिनेते संतोष आमले यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी रायगड भूषण पुरस्कार विजेते डॉ. कुमार शिंदे, महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग चे जनरल सेक्रेटरी आणि शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त संजय सरदेसाई, खजिनदार सूर्यकांत गद्रे(खजिनदार, महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग,) दत्ता पाटकर(माजी कबड्डीपटू), ज्येष्ठ योगा शिक्षक रामदास झोपे, पॉवरलिफ्टिंग संघटनेचे अध्यक्ष गिरीश वेदक, तसेच सदस्य सुभाष टेंबे, माधव पंडित, संदीप पाटकर सहसचिव सचिन भालेराव, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल दिनेश पवार, अमृता भगत, गायत्री बडेकर, नासिर सय्यद या खेळाडूंचा गौरव करण्यात आला. तसेच राष्ट्रीय गतिमंद स्पर्धेत पदक प्राप्त केल्याबद्दल जितेश साजेकर याचा सत्कार झाला.





या स्पर्धेमध्ये विविध गटामध्ये 100 पेक्षा अधिक मुले/मुली , पुरुष /महिलाखेळाडू सहभागी झाले होते. या स्पर्धेसाठी पंच म्हणून मुंबईचे अनंत चाळके (शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त) प्रशांत सरदेसाई (राष्ट्रीय पंच)गोपीनाथ पवार(आंतरराष्ट्रीय पदक विजेते), सुरेश धुळप(राष्ट्रीय पदक विजेता) नवी मुंबईचे राकेश पाटील, राजेश शिर्के, मुंबई उपनगरचे विशाल मुळये, उदय स्वामी हे उपस्थित होते.

तर मदतनीस म्हणून मोरेश कारळे, अविनाश शेट्टी, ओम घोलतकर, शशिकांत वाघमारे, महेश वाघमारे, विवेक सांबरे ,रोहन कांबळे ,मयूर कोलकर आणि प्रांजल पाटेकर यांनी काम केले. या स्पर्धेला समाजसेवक प्रदीप घरत यांनी सदिच्छा भेट देऊन संघटनेस धन्यवाद दिले.

स्पर्धेच्या सर्व प्रकारे व्यवस्थापनाची जबाबदारी कार्याध्यक्ष यशवंत अंबाजी मोकल यांच्या अनुभवी मार्गदर्शनाखाली संदीप कृष्णा पाटकर, तन्मय शरद बारणे,संदीप स्वरूप पाटकर यांनी उत्कृष्टरित्या सांभाळली.

या स्पर्धेतील विजेत्यांना दैनिक राम प्रहर चे वृत्त संपादक समाधान पाटील, महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंगचे संजय सरदेसाई, रायगडचे जेष्ठ पॉवरलिफ्टिंग खेळाडू

माधव पंडित ,माजी कबड्डीपटू दत्ता पाटकर, सुभाष टेंबे, संदीप कृष्णा पाटकर, तन्मय बारणे ,राहुल गजरमल, इत्यादी मान्यवरांच्या हस्ते कै. कु. दीपक सुरेखा अरुण पाटकर यांच्या स्मरणार्थ पदक व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.

**खालील प्रमाणे आहेत**

**पुरुष विजेते**

१) सब ज्युनिअर बेंचप्रेस स्ट्रॉंग बॉय - जाहिद काणेकर . (द क्वाडझिला फिटनेस महाड)

२) ज्युनिअर बेंचप्रेस स्ट्रॉंग बॉय --- तन्मय पाटील (वैयक्तिक, पेण)

३) सीनियर बेंचप्रेस स्ट्रॉंग मॅन
गणेश तोटे (फिटनेस ऑन जिम,पनवेल)

४) मास्टर्स बेंचप्रेस स्ट्रॉंग मॅन -- दिनेश पवार (स्पार्टन जिम, खोपोली)

**महिला विजेते**

१) सब ज्युनिअर बेंचप्रेस स्ट्रॉंग गर्ल---
२)गायत्री बडेकर.(आय एन डी क्लब कर्जत)

३) सीनियर बेंचप्रेस स्ट्रॉंग वुमन --
अमृता भगत(पॉवर हाऊस क्लब, खोपोली)

४) मास्टर बेंचप्रेस स्ट्रॉंग वुमन-- आशा घरत. (हनुमान व्या.शाळा, पेण)

**सांघिक विजेतेपद**

१) आय एन डी क्लब, कर्जत

२) द क्वाडझिला फिटनेस, महाड

३) फिटनेसऑन जिम .
(तक्का-- पनवेल)

---

# रिसोड: हराळ येथील बहिण-भावंडाने केले यश संपादन

**दैनिक युवक आधार**
**रिसोड. रणजितसिह. ठाकूर**

हराळ येथील पोलीस खात्यामध्ये सेवा करणाऱ्या केशव सरकटे यांचा मुलगा सौरभ सरकटे यांची आयबिपिएस स्पर्धा परीक्षे द्वारे सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या क्रेडिट ऑफिसर या पदी नियुक्ती करण्यात आली तर कु कोमल केशव सरकटे हिने बीडीएस ( दंत चिकित्सक) ही पदवी संपादन केली. कुळी कन्या पुत्र... याप्रमाणे पोलीस खात्यामध्ये सेवा देणाऱ्या केशव भाऊ सरकटे त्यांचा सरळ प्रामाणिक अधिकारी म्हणून नावलौकिक आहे. त्यांच्या परिवाराच्या संस्कारात वाढलेल्या या मुलांनीही आपल्या परिवाराची परंपरा कायम ठेवून दोन वेगवेगळया क्षेत्रात यश संपादन केले आहे. केशव भाऊ यांच्या महाविद्यालयीन मित्रांनी आज त्यांच्या हराळेतील राहत्या घरी जाऊन त्यांच्यासह दोन्ही बहिण-भावनाचे भेटवस्तू आणि शाल श्रीफळ देऊन कौतुक आणि सत्कार केला. यावेळी हराळाचे सरपंच श्रीविष्णू भाऊ सरकटे नाना




हे उपस्थित होते. यामध्ये ठाकूर महावीर सिंह अध्यक्ष मा श्री विष्णुपंत भुतेकर, सभापती मित्रपरिवार, श्री अनिल बामणीकर ,श्री पुरुषोत्तम दादा रंजवे ,चेअरमन, श्री गिरीश देशमुख, मुख्याध्यापक, श्री भुजंग जाधव ,शिक्षक, श्री अशोक गीते शिक्षक ,श्री माणिक कांबळे शिबिर संयोजक व समस्त गावकरी मंडळी उपस्थित होती.

# श्री क्षेत्र पिंगलाक्षी देवी संस्थान येथे स्वच्छता अभियान

**दैनिक युवक आधार**
**रिसोड.. प्रतिनिधी. रणजितसिह. ठाकूर..**

स्वच्छता हि प्रत्येक मानवाला आवडणारी तसेचं निरंतन चालणारी बाब असुन सुदृढ व आनंदी जीवन जगण्याची एक किमया आहे .त्यामुळे प्रत्येक सूजाण नागरिकाने स्वच्छतेचा मनोभावे स्विकार करत दैनंदिन जीवनामध्ये त्याची अंमलबजावणी करणे काळाची गरज आहे.असे वक्तव्य वृक्षमित्र गजानन मुलंगे ह्यांनी श्री क्षेत्र पिंगलाक्षी देवी संस्थान रिसोड येथे आयोजित केलेल्या स्वच्छता अभियान कार्यक्रमा दरम्यान व्यक्त केले. आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये गजानन कोरडे पोलीस पाटील रिसोड,विष्णु जटाळे वनपाल सामाजिक वनिकरणं परिक्षेत्र रिसोड,सेवानिवृत्त मुख्याध्यापक मदन चौधरी,ह.भ.प.सोपान महाराज,मंदिर व्यवस्थापक व पुजारी अशोक वाघमारे तसेचं शालेय विद्यार्थी ईत्यादिंनी सहभाग नोंदविला.स्वच्छता हा मानवाचा




अविभाज्य अंग आहे पण काही विशिष्ट ठिकाणची स्वच्छता होणे आवश्यक का आहे हे पटवून देतांना मुलंगे म्हणाले कि,घटस्थापनेपासुन तर विजयादशमी पर्यंत अर्थात नवरात्रामध्ये सकाळ प्रहरी 4.30 वाजता पिंगलाक्षी देवीची आरती होत असल्यामुळे रिसोड तसेचं पंचक्रोशीतील भक्तांची सकाळी 3.30 वाजतापासुनचं अनवाणी व पैदल मांदियाळी प्रारंभ होते. काही अन्नदात्याकडुन मंदिर परिसरामध्ये नऊ दिवस प्रसाद रूपी खाद्यपदार्थाची तसेचं चहाची सुध्दा व्यवस्था केली जाते. याशिवाय बेल फुल,कटलरी, उपहार गृह तसेचं निर्माल्यामुळे परिसरामध्ये कचरा होणे स्वाभाविक आहे.मंदिराला लागून असलेल्या व निर्मळ पाण्याने तुडुंब भरलेल्या तलावाची पावित्र्यता राखणे अनिवार्य असल्याकारणाने दरवर्षी या ठिकाणी स्वच्छता अभियान राबविले जाते नव्हे तर राबविल्या गेलेचं पाहिजे हेही तेवढेच खरे.स्वच्छतेचे कार्य करत असतांना काही मुलांनी मंदिरा मागील विशालकाय वटवृक्षाच्या पारंब्यांना लोंबकळत झोके घेण्याचा मनमुराद आनंद लुटला.दरवर्षी विजयादशमीनंतर गावोगावी असणार्या देवीच्या मंदिर परिसराची स्वच्छता ऊत्साही मंडळीकडुन व्हावी असा मोलाचा सल्ला उपस्थितांना देण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता सुधाकर वाघमारे, दिनकर गोटे,प्रतिक्षा मुलंगे,वेदिका थोरात तसेचं बाल- गोपालांनी भरीव योगदान दिले."घरोघरी स्वच्छता,आजारातून मुक्तता" च्या घोषणा देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

---

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक उभारणी कामाचा सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्याकडून आढावा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, वार्ताहर** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल, दादर येथे उभारण्यात येत असलेल्या भव्य स्मारक आणि पुतळ्याच्या कामाचा आढावा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी घेतला. यावेळी आनंदराज आंबेडकर, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ हर्षदीप कांबळे, मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाचे मुख्य अभियंता श्री प्रकाश भांगरे, प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभाग श्री बाळासाहेब



सोळंकी, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण मुंबई शहर श्री रविकिरण पाटील,वरिष्ठ अधिकारी श्री उमेश साळुंखे, यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना सामाजिक न्यायमंत्री श्री. शिरसाट म्हणाले, समुद्राच्या शेजारी हे भव्य स्मारक साकारत आहे. या ठिकाणी उभारण्यात येत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा उभारणीबाबत शिल्पकार राम सुतार यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण सूचनांचा विचार करण्यात आला असून त्याबाबत संबंधित विभागास अवगत करण्यात आले आहे. पुतळ्याच्या तांत्रिक बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. पुतळा विहित वेळेत उभा करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्यात आला आहे. डिसेंबर २०२६ पर्यंत स्मारकाचे काम पूर्ण करण्याचा मानस असल्याचेही मंत्री श्री शिरसाट यांनी यावेळी सांगितले.

# गर्दुल्ल्यांविरोधात मोकळा श्वास फाउंडेशन मुबंई यांच्या पुढाकाराने घाटकोपरवासी एकवटले

**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर,(केतन भोज)**

मोकळा श्वास फाउंडेशन मुबंई यांनी अंमलीपदार्थ आणि नशाबंदी घाटकोपर नशाबंदी विरोधात मोहीम सुरु केली.मोकळा श्वास फाउंडेशन मुबंई हे प्रत्येक वेळेला काहीना काही विषय घेत समाजाला न्याय मिळविण्यासाठी लढा देण्यासाठी सर्व पक्षाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांना एकत्रित करुन प्रयत्न करीत असते.यावेळी मोकळा श्वास फाउंडेशन मुबंई यांच्या सर्व पदाधिकारी यांनी घाटकोपर पश्चिम पोलीस ठाण्यातले वरिष्ठ पोलिस निरीक्षक सतिश जाधव यांची या संदर्भात भेट घेतली.तसेच वरिष्ठ पोलिस निरीक्षक सतिश पाटील यांनी ही हा गंभीर विषय समजून घेत यासाठी वेळ देत विषय समजावून घेतला.व बहुमूल्य सल्ला देऊन एक विशेष नशाबंदी कारवाई मधील ATC अधिकारी श्रृगारे व त्यांची टीम तुम्हाला २४ तास सहकार्य करेल असे त्यांनी यावेळी असे आश्वासन दिले.



यावेळी घाटकोपर पश्चिम येथील अनेक समाजसेवक लोकप्रतिनिधी सोबत होते.यावेळी श्रीमती नंदाताई गव्हाणे,सौ.अश्विनी मते, माजी नगरसेवक दिपकबाबा हांडे तसेच सुर्यकांत गवळी,उमाकांत चव्हाण,प्रकाश पाटील,दत्तात्रय चौगुले,प्रकाश तावडे,विजय बाबर,संतोष सांळुखे,राष्ट्रवादी काँग्रेसचे अमोल मातेले तसेच संस्थेचे प्रतिनिधी संतोष कोकांटी,प्रतिक थोरात,संदीप सावंत,राजू सावंत उपस्थित होते.

---

# कोजागिरी पौर्णिमेचा आनंद चंद्र साक्षीने

**लोणी / प्रतिनिधी**
**ज्ञानेश्वर साबळे यांचा विशेष अहवाल -**

आश्विन पौर्णिमेच्या रात्री साजरी होणारी कोजागिरी पौर्णिमा ही भारतीय संस्कृतीतील आनंद, श्रद्धा आणि परंपरेचं प्रतीक मानली जाते.

या दिवशी चंद्र सर्वाधिक तेजस्वी असतो आणि असा समज आहे की या रात्री जागणाऱ्यांवर देवी लक्ष्मीची कृपा होते.

लोक चंद्रप्रकाशात दूध उकळतात, गप्पा मारतात आणि नात्यांच्या उबेत रात्र साजरी करतात.

अशाच या सुंदर वातावरणात निर्मळ आबा आणि त्यांची पत्नी वनिता निर्मळ यांनी चंद्र साक्षीने पारंपरिक चूल पेटवून कोजागिरीचा सण अनोख्या पद्धतीने साजरा केला.

रात्रीच्या थंड वाऱ्यात चुलीवर उकळणारं दूध, चंद्राच्या रुपेरी प्रकाशात झळकणारं दाम्पत्य — सगळं दृश्य जणू मराठी संस्कृतीचं दर्शन घडवत होतं. निर्मळ आबा म्हणाले, “आजच्या आधुनिक



युगात आपली संस्कृती जपणं हीच खरी श्रीमंती आहे. चूल, चंद्र आणि कुटुंब – हीच खरी कोजागिरी.”तर वनिता निर्मळ म्हणाल्या, “ही रात्र आमच्यासाठी फक्त सण नाही, तर आपल्या नात्यातील प्रेम आणि परंपरेचा संगम आहे.” परिसरातील नागरिक, मित्रमंडळी आणि नातेवाईक उपस्थित राहून दुधाचा आस्वाद घेतला. हास्य, गप्पा आणि चांदण्याचं सौंदर्य — सगळं वातावरण आनंदमय झालं होतं.

# झी-लाइव्हतर्फे ‘मराठी वाजलंच पाहिजे’

## मराठी तरुणाई स्ट्रीट-आर्टमधील गुणवत्तेसह महाराष्ट्राच्या नव्या पिढीचं दर्शन घडवणार

**दैनिक युवक आधार**

**मुंबई,वार्ताहर** : झी एंटरटेनमेंट एंटरप्रायजेस लिमिटेड (झी) या भारतातील कंटेंट आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने आज त्यांच्या नव्या प्रायोगिक टप्प्याच्या पहिल्या अध्यायाची झी लाइव्हची घोषणा केली. त्याअंतर्गत वर्ल्ड ऑफ वाइब्ज या टॅलेट कंपनीच्या सहकार्याने मराठी वाजलंच पाहिजे (एमपीव्ही) हा पहिला प्रमुख कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. १२ ऑक्टोबर रोजी फिनिक्स मार्केट सिटी, पुणे येथे होणार असलेला एमपीव्ही हा केवळ एक लाइव्ह कॉन्सर्ट नाही, तर ती एक सांस्कृतिक चळवळ आहे. त्यामधे मराठी तरुणाई संस्कृतीचं प्रतिबिंब झळकणार असून हिप-हॉप, इंडी म्युझिक, स्ट्रीट आर्टमधील नव्या गुणवत्तेसह महाराष्ट्राच्या नव्या पिढीचं दर्शन घडवलं जाणार आहे.

क्रॅटेक्स, संजू राठोड, श्रेयस अँड वेदांग, एमसी गावठी आणि पट्या द डॉक अशा ४०+ कलाकारांचा समावेश असलेलं




हे फेस्टिवल धमाल उर्जेसह आजच्या तरुणाईची अस्सल आणि लोकल गोष्ट सांगणार आहे. एमपीव्ही हा असा मंच आहे, जिथं परंपरा आणि आधुनिक अभिव्यक्तीचा संगम होईल आणि आजच्या क्रिएटर्सच्या सूर, ताल आणि काव्यासह मराठी अभिमानाची व्याख्या नव्यानं मांडली जाईल.

कार्यक्रमाचा प्रभाव आणखी तीव्र करण्यासाठी झी-लाइव्हने मराठी झी5 सह भागिदारी करत एमपीव्हीची उर्जा प्रत्यक्ष मंचाच्या पलीकडे सर्वदूर जाईल याची काळजी घेतली आहे. खास डिजिटल कंटेंट, आर्टिस्ट स्पॉटलाइट्स व बिहाइंड-द-सीन्स स्टोरीजच्या माध्यमातून हे फेस्टिव्हल प्रत्यक्षातील उर्जेचा अनुभव डिजिटल पातळीवर पोहोचवेल आणि भारतभरातील तरुण चाहत्यांना त्यांची संस्कृती व समाजाशी सहज कनेक्ट होता येईल.

गॅरेथ इस्विन थॉमस, व्यवसाय प्रमुख, झी-लाइव्ह म्हणाले,''‘मराठी वाजलंच पाहिजे हा केवळ एक कार्यक्रम नाही, तर तो सांस्कृतिक ओळख आणि तरुणाईची अभिव्यक्ती आहे. हा कार्यक्रम कशाप्रकारे तरुण पिढीची उर्जा लाइव्ह अनुभवात कशाप्रकारे मांडली जाऊ शकते, अविस्मरणीय क्षणांची निर्मिती कशी केली जाऊ शकते याचं प्रतीक आहे. सांस्कृतिक उत्सवाची ही नवी भाषा आहे.’'

व्ही.आर.हेमा, व्यवसाय प्रमुख, झी5-झी मराठी म्हणाल्या,''‘झी लाइव्हच्या सहकार्याने आम्ही मराठी तरुणांना स्थानिक आणि जागतिक मंच देत आहोत. त्यांचा आवाज आणि त्यांचं संगीत डिजिटल प्लॅटफॉर्म्सद्वारे सर्वांपर्यंत पोहोचवत आम्ही फक्त त्यांचा परफॉर्मन्सच नव्हे, तर त्यांची गोष्ट, संघर्ष आणि स्वप्नंही मांडत आहोत. एमपीव्ही प्रादेशिक कथांच्या क्षेत्रातील नवे पर्व आहे आणि ते धाडसी, अभिमानास्पद, अस्सल व कनेक्टेड आहे.’'

## कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालयात वाल्मिकी ऋषी यांची जयंती साजरी




**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी: महादेव उप्पे**

**देगलूर :** कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय अंतर्गत सांस्कृतिक विभागाच्या वतीने दिनांक ०७ ऑक्टोंबर २०२५ रोजी वाल्मिकी ऋषी यांची जयंती साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.उमाकांत बिरादार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून भूगोल विभाग प्रमुख डॉ. कळसकर सूर्यकांत हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.सौ कांबळे शीलादेवी यांनी केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.पवन एमेकर यांनी केले.

या कार्यक्रमानिमित्ताने डॉ.आनंद शिंदे यांनी 'वाल्मिकी ऋषी यांचे जीवन चरित्र 'या विषयावर आपले विचार मांडले.

बी.ए.द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी कु.गंगाजी मुत्तमा यांनी आभार मानले.या कार्यक्रमासाठी महत्त्वाची भूमिका संतोष सुरेवाड यांनी भूषवली.

या कार्यक्रमास डॉ.उत्तम मानवते डॉ.अशोक साबणे डॉ.सुनिता कांबळे,जयप्रकाश झमकाडे,मारोती चव्हाण,वाघमारे,रोहित कांबळे आदींची उपस्थिती होती.

# अष्टपैलु" मनिषा" ठरू शकते कळंब तालुक्याला दिशा आणि गती देणारा नवीन चेहरा

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

**कळंब :-** मनिषा राजकीय परीघाबाहेरही तशीच मनमोकळी आणि सरळ तिच्याच राजकीय, सामाजिक असं एकमेकांपासून वेगवेगळ काढण्याजोग द्वैत सापडणं मुश्किल आहे,नेहमी सार्वजनीक आणि व्यापक जनहीताच्या कामांत अग्रणी रहाणारी मनिषा काटे (भोसले),कळंब तालुक्यात लहानापासून वृद्धांपर्यंत सर्वांची लाडकी आणि सर्वांना परीचीत खरंतर कळंब तालुका म्हटलं की,अतिशय छोटे छोटे गाव आदिवासी बहुल आणि शैक्षणीक मागासलेपण,गरीबी, अडचणीशी झुंज देणारा हा कळंब तालुका,विशेष म्हणजे राजकीय क्षेत्रात नेहमीच पुरुष प्रधान राहीलेला तालुका अशातच २०१२ मध्ये राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात आंदोलनाच्या माध्यमातून प्रवेश होतो मनिषा काटेचा शांत,सोज्वळ,तेवढीच



सनकी,डेरींगबाज,मनात आले तर बुक्कीने पर्वत फोडण्याची धमक ठेवणारी लहानगी तशीच भव्य मनिषा..!कळंब पासुन ७-८ किमी अंतरावर असलेल्या मूळ मावळणी या ७९७ लोकसंख्या असलेल्या गावची आतिशय सामान्य,शेतकरी कुटुंबात तिचा जन्म झाला,शाळा कॉलेजमध्ये असतानाच तिच्यात अन्याय आणि कायदाशी विसंगत गोष्टीविरोधात बंड उभारण्याची तिची प्रवृत्ती,यातुनच कॉलेजमधील मुला-मुलींना सोबत घेत ५३ मुलींची छोटीशी चळवळ तिच्या माध्यमातून उभी राहिली.. त्यातूनच सामाजिक कार्याला सुरुवात झाली.हळूहळू तिच्या कामाचा परीघ व्यापत गेला,जनसंपर्क वाढायला सुरुवात झाली.लोकहीताच्या कामामध्ये कुठलाही राजकीय,स्वार्थ किंवा हेतू न ठेवता ती गावातील दारुबंदी,जुगारबंदी,यासाठी बेधडक महिलां सोबत घेऊन आंदोलने आणि मोर्चे करायला लागली आणि अर्थातच यातून कित्येक गावं आज दारूमुक्त झाली कित्येक कुटुंब व्यसनमुक्त झाली,कित्येक संसार उध्वस्त घेण्यापासुन बचावली.तिचे समाजकार्य रुग्णसेवेच्या क्षेत्रातही ठसा उमटवू लागले.२०१७ पासून ७०० च्या वर रुग्णांच्या डोळयांची तपासणी, ३७६ मोतिबिंदू शस्त्रक्रिया, पडदा,नासुर,शस्त्रक्रिया इत्यादी च्या माध्यमातून सुद्धा ती वयोवृद्ध लोकांच्या मध्ये लाडकी व्हायला लागली.रुग्णसेवक हून सर्व कळंब तालुक्याला ती परीचित झाली रात्री,अपरात्री रुग्णसेवेकरिता ती सदैव तत्पर असते.विषबाधा असो हृदयविकाराचा झटका,असो सर्पदंश असो कि मग प्रसुती फोन वाजला की रुग्णांच्या मदतीला मनिषा हजर असतेच.डोंगराळ आणि अतिदुर्गम भागात विद्यार्थ्यांना बसची अडचण असली की मनिषा लगेच विद्यार्थ्यांचा मोर्चा घेवुन परिवहन विभागाला जावून बससेवा सुरू करुन देण्याकरिता तयार असते.कित्येक गावामध्ये स्वातंत्र्यापासून बससेवा नसताना मावळणी-मैतापूर गावामध्ये मनिषाच्या प्रयत्नांनी बससेवा सुरू झाली.शेतक-यांच्या पांदण रस्त्यांच्या अडचणी असल्या,पिकविम्याच्या अडचणी असल्या की मनिषा शेतकऱ्यांचा लढा उभारून त्यांना न्याय देण्यासाठी सदैव तत्पर असते.याच तिच्या तत्परतेतून आणि निस्वार्थ भूमिकेतून आज ती आबाल वृद्धांच्या मनापर्यंत पोहचलेली आहे.समाजाचा असा एकही घटक नाही की, जिथे मनिषा परीचीत नाही.सर्वच राजकीय पक्षातील नेते, कार्यकर्ते यांच्याशी जुळवून घेणारी मनिषा काटे ही राजकारणात आणि समाजकारणात अत्यंत प्रामाणिक मुल्यांना प्राधान्य देत मार्गक्रमण करीत आहे.

## अखिल भारतीय आगरी साहित्य संस्था आयोजित साहित्य संगम सोहळा उत्साहात संपन्न !!

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी/एम.डी.भोईर**

आखिल भारतीय आगरी साहित्य संस्था आयोजित साहित्य संगम सोहळा रविवार दिनांक ५ ऑक्टोबर रोजी अलिबाग तालुक्यातील मांडला येथील ग्रीन किंग रिसॉर्ट येथे शेकडो साहित्यिकांच्या उपस्थिती मध्ये संपन्न झाला.

सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक अमृत पाटील हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून अलिबाग नगरपालिकेच्या माजी उपनगराध्यक्षा सौ . मानसी म्हात्रे,संस्था अध्यक्ष कैलास पिंगळे, साहित्यिक सुरेश भोपी , साहित्यिक चंद्रकांत पाटील , आवाज महामुंबईचा चॅनेल चे संपादक श्री मिलिंद खारपाटील , ॲड.राकेश पाटील,ज्येष्ठ पत्रकार धम्मशील सावंत आदी मान्यवर उपस्थित होते.

आगरी भाषा लोप पावणार नाही.एक आगरी लाखांना भारी असे संस्थेचे अध्यक्ष श्री कैलास पिंगळे सर यांनी प्रास्ताविकात सांगितले.



आगरी भाषा जोमाने पुढे जाईल. अनेक नवनवीन पुस्तके आगरी भाषेत येत आहे.नवोदिताचे स्वागत करून, त्यांचे अभिनंदन ॲड मानसी म्हात्रे यांनी केले. तुम्ही उच्चशिक्षीत झाले पाहिजे आणि तुमच्या साहित्यातून तुमचे समृद्ध विचार लोकांपर्यंत पोचवायला हवेत असेही त्या म्हणाल्या.

सुरुवातीला वावे ग्रामस्थांचे सुरेख असे गायन आणि भवर नृत्य झाले.यानंतर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा शाल,पुष्पगुच्छ,सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.यामध्ये जेष्ठ साहित्यिक सुरेश भोपी,कृष्णा जोशी,मारुती बागडे,अरुण द. म्हात्रे, प्रा.संदेश पाटील,जयंत पाटील ,विकास पाटील ,चंद्रकांत कांडपिले यांचा समावेश आहे.

अन्यायाला वाचा फोडणाऱ्या निर्भीड रणरागिणी सौ मानसी म्हात्रे यांना सरखेल पुरस्काराने सन्मानित करून त्यांच्या कार्याची उचित दखल घेण्यात आली.

या कार्यक्रमात नंदेश गावंड यांच्या आगरास्त्र या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृप्ती गावंड यांनी ओघवत्या शैलीत केले.कार्यक्रमाची सुरेख सांगता सुश्राव्य भजनाने झाली.

## दहाव्या 'वंदन सम्मान सोहळा'मध्ये जिव्हाळ्याची भिंत अन्नदान छत्र सेवेला सलाम!

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधि. महेश पेन्दोर**

'वंदन सम्मान सोहळा' या प्रतिष्ठित कार्यक्रमाच्या दहाव्या पर्वात, अन्नदान छत्राच्या माध्यमातून गेली दहा वर्षे निःस्वार्थपणे सेवा करणाऱ्या एका सेवाभावी व्यक्तीचा सुरज जी हेमके सत्कार करण्यात आला. हे कार्य खऱ्या अर्थाने समाजासाठी प्रेरणादायी ठरले आहे.

या सोहळ्यात सुरेशजी राठी साहेब आणि अनंत कैलगीरकर साहेब यांच्या हस्ते हा बहुमान प्रदान करण्यात आला. सत्कारमूर्तींनी आपल्या मनोगतात, राठी साहेब व कैलगीरकर साहेब यांचे उपकार शब्दांत व्यक्त करणे शक्य नाही, अशी भावना व्यक्त केली.

सत्कारमूर्तींनी नमूद केले की, "गेल्या १० वर्षांपासून मी करत असलेल्या अन्नदान छत्र सेवेचा तुम्ही सन्मान केला, त्याबद्दल मी तुम्हा सर्वांचा मनापासून ऋणी आहे." तसेच, या अन्नदान सेवेची संधी ज्यांच्यामुळे मिळाली, त्या विलासभाऊ पवार यांचाही त्यांनी विशेषत्वाने आभार मानला.

या सन्मानामुळे आपले कार्य जिल्ह्याभरात



प्रकाशात आल्याची भावना सत्कारमूर्तींनी व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, "सातत्याने मी करत आलेलं सेवाकार्याचीं जिल्हाभर माहिती नव्हती. या सन्मान सत्कारामुळे माझं कार्य प्रकाश झोतात येत आहे." या सन्मानामुळे भविष्यात अधिक उत्साहाने कार्य करण्याची प्रचंड ऊर्जा मिळाली आहे, असेही ते म्हणाले.

सुरेशजी राठी आणि अनंत कैलगीरकर साहेब यांनी या सेवाभावी व्यक्तीच्या कार्याचे कौतुक केले आणि समाजात अशा नि:स्वार्थ कार्याची खूप गरज आहे, असे मत व्यक्त केले. हा सोहळा समाजाला सेवा आणि त्यागाची महती सांगणारा ठरला.

## राजस्थानातील पवन जांगीडने आपल्या कारागिरीने परतूरात जिंकली अनेकांची मने...

**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना(अशोक ठोके)**

एका बाजूला महाराष्ट्रातील तरुणांमध्ये बेरोजगारीची समस्या वाढत असताना, दुसरीकडे राजस्थान राज्यातील एका २५ वर्षीय तरुणाने आपल्या मेहनतीच्या जोरावर महाराष्ट्रात यशस्वी व्यवसायाचा आदर्श घालून दिला आहे. पवन जांगीड नावाचा हा तरुण आज जालना जिल्ह्यातील परतूर तालुक्यात आपल्या हातातील लाकडी फर्निचरच्या उत्कृष्ट कारागिरीने अनेकांची मने जिंकत आहे, आणि सन्मानाने आपला उदरनिर्वाह चालवत आहे.

१२ वर्षांची कला, २५ वर्षांची जिद्द.मूळ राजस्थानमधील एका खेडेगावातून आलेल्या पवन जांगीड यांनी केवळ दहावीपर्यंतचे शिक्षण घेतले आहे. विशेष म्हणजे, अवघ्या १३ व्या वर्षी त्यांनी लाकडी फर्निचरच्या कामात आपले कौशल्य आजमावण्यास सुरुवात केली. आज २५ वर्षांचे असताना त्यांना या क्षेत्रात तब्बल १२ वर्षांचा अनुभव पूर्ण झाला आहे! इतक्या कमी वयात कामातील एवढा मोठा अनुभव आणि त्यातून साकारलेली कला खरोखरच कौतुकास्पद आहे.'घराला घरपण' देणारी कारागिरी

पवन जांगीड यांनी महाराष्ट्रात स्वतःचा कारागिरी व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या कामातील सफाई, अचूकता आणि कलात्मकता 'जबरदस्त' आहे. त्यांच्या हाताने तयार झालेले फर्निचर केवळ लाकडाचा वस्तू नसतात, तर त्यातून घराला एक खास 'घरपण' मिळते. त्यांचे काम पाहिल्यानंतर, त्यांच्या कामाचा हातखंडा किती पक्का आहे, हे लगेच लक्षात येते.उत्कृष्ट कला आणि व्यावसायिक सचोटी यामुळे परतूर तालुक्यात त्यांची कारागिरी अल्पावधीतच प्रत्येकाच्या मनाला भिडणारी ठरली आहे. एका राज्यातील तरुण दुसऱ्या राज्यात येऊन आपल्या कलेच्या बळावर यशस्वी होतो, हे आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी उदाहरण आहे.

पवन जांगीड यांनी सिद्ध केले आहे की, डिग्रीपेक्षा कौशल्य आणि मेहनत हीच यशाची खरी गुरुकिल्ली आहे.



## अवैध दारू विक्री बाबत राज्य उत्पादन शुल्क विभागास मनसेचे निवेदन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत)**

आज रोजी राज्य उत्पादन शुल्क विभाग, नाशिक येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने निवेदन देण्यात आले.

दिंडोरी सह इतर तालुक्यातील निगडोळ, कादवा म्हाळुंगी, रवळगाव, कोचरगाव, कोकणगाव व दिंडोरी तालुक्यात परिसरामध्ये गेल्या काही वर्षांपासून अवैध दारू व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे.

. आगामी दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर तरुण वर्गामध्ये दारूचे प्रमाण अत्यंत वाढले असून, त्यामुळे घरात धिंगाणा



करणे, घरगुती वाद निर्माण करणे , तसेच अपघातांच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. काही ठिकाणावर तर महिला बचत गटाने दारू विक्रेत्यांना काही दिवसापूर्वी समज पण दिली होती की आजचे पंधरा-सोळा वर्षे खालील मुले ही नशेच्या आहारी गेलेले आहेत त्यामुळे तुम्ही दारू विक्री बंद करा तरीपण या दारू विक्रेत्यांनी दारू विक्री बंद केलेली नाही.

त्यामुळे सदरील परिसर व तालुक्यातील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

यामुळे सर्व गावांमधील अवैध दारू धंद्यांवर तात्काळ बंदी घालून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

# राधाकृष्ण जय कुंजविहारी मुरलीधर गोवर्धनधारी₹ या नाम घोषात मुल्हेर येथे साजरा होणार ऐतिहासिक रासक्रीडा उत्सव

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक विनोद गायकवाड**

श्री उद्धव महाराज यांची समाधी असलेले श्रीक्षेत्र मुल्हेर येथे प्राचीन परंपरा असलेला रासक्रीडा उत्सव दोन पौर्णिमा असल्याने मंगळवार दि.७ ऑक्टोबर २०२५ रोजी पार पडणार असून क्षत्रिय मराठा समाज बांधवांनी रासचक्रा भवतीचे दांड्या शनिवारी रोवल्यात या महोत्सवात १८ पगड जातीधर्मातील लोकांचा हातभार असतो वर्षानुवर्षे चालत आलेला रासक्रीडा हा उत्सव म्हणजे मुल्हेरच्या सांस्कृतिक वैभवातील मानाचा शिरपेच कोणत्याही प्रकारचा दांडिया व आधुनिक पद्धतीना तोडत शास्त्रीय संगीतावर आधारित ब्रज भाषेतील, उत्तर हिंदुस्तानातील भजन हे खास वैशिष्ट्य रासक्रीडेत एकूण १०५ पदे ही तब्बल अखंड ११ तास अहिराणी, हिंदी, गुजराती, ब्रज व संस्कृत भाषेत गाइले जातात.



या रासक्रीडेची परंपरा ही कृष्णभक्त राजा मयूर ध्वजाने श्रीकृष्णाच्या दर्शनापासून मुल्हेर येथे सुरू केली म्हणजेच साधारण इ.स. पूर्व ३००० आणि श्री उद्धव महाराजांचे गुरु श्री काशीराज महाराज यांनी रासक्रीडेला १६४० ला पुनरुज्जीवन दिले तेव्हापासून आतापर्यंत म्हणजे साधारण ३८९ वर्षापासून अखंडपणे ही परंपरा मयूरनगरीत चालू आहे असे आख्यायिकेनुसार समजते.

रासक्रीडेची सुरुवात ही रासचक्राच्या बांधणी पासून सुरू होऊन सुमारे २८ फूट व्यासाचे चक्र बांधून दोरीच्या साहाय्याने



विणले जाते.

त्यात केळीची पाने व झेंडूची फुले लावून चाकाची सजावट केली जाते. हे चाक संपातकाळी म्हणजे ६ वाजून ०५ मिनिटांनी चंद्र व सूर्य यांच्या साक्षीने रासस्तंभावर चढविले जाते. यावेळी उपस्थित भाविक "श्री उद्धव महाराज की जय" असा नाम घोष करत क्षणार्धात चाक रास स्तंभावर चढवितात पदातील शेवटची भैरवी गातांना सगळ्यांचे डोळे भरून येतात आणि त्यानंतर काही क्षणात रासाचे चक्र रास स्तंभावरून खाली उतरवले जाते. कितीतरी संकटांना दूर करणारा हा आनंद एका रात्रीत मिळाला या अनामिक भावनेने प्रत्येक जण एकमेकांचा निरोप घेतो तो पुढच्या वर्षी एकत्र जमण्यासाठीच!

यंदाच्या वर्षी दोन दिवस पौर्णिमा असल्याने रासक्रीडा उत्सव दुसऱ्या दिवशी म्हणजेच ७ ऑक्टोबर २०२५ मंगळवार रोजी मुल्हेर येथील श्री उद्धव महाराज समाधी समोर असलेल्या १४ फूट रास स्तंभावर सायंकाळी रासचक्र चढवून सुरू होईल. त्या निमित्ताने या परिसरात यात्रेचे आयोजन केले असून येणाऱ्या सर्व भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात येते. या कार्यक्रमास भाविकांनी उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन मठाधिपती भक्तराज महाराज, संस्थान प्रमुख किशोर महाराज, श्रीकांत महाराज, सरपंच, उपसरपंच,गावातील सर्व ग्रामस्थ व उद्धव महाराज सेवा समिती, नाम सप्ताह समिती, लाइटिंग मंडळ आदींनी केले आहे.

# कोल्ड्रिफ सिरप, बॅच नं. SR-13 या कफ सिरपमध्ये विषारी पदार्थ ?

## वापर तात्काळ थांबवा ! अन्न व औषध प्रशासनास त्वरित कळवा ;

**दैनिक युवकआधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी /प्रदीप पाटील**

कोल्ड्रिफ सिरप, बॅच नं. SR-13 या कफ सिरपमध्ये विषारी पदार्थ आढळल्यामुळे त्याचा वापर नागरिकांनी तात्काळ थांबवावा. जर हे औषध कोणाकडे उपलब्ध असेल, तर ते जवळच्या अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यालयास त्वरित कळवावे किंवा ई-मेल: acfdartn2019@gmail.com माध्यमातून थेट अन्न व औषध प्रशासनाला माहिती द्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य अन्न व औषध प्रशासनचे सहाय्यक आयुक्त (औषधे) शशिकांत यादव यांनी केले आहे.

मध्यप्रदेश आणि राजस्थान या राज्यांमध्ये या कफ सिरप औषधाच्या वापरामुळे काही बालकांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे. या बाबत महाराष्ट्राच्या अन्न आणि औषध प्रशासनाला सतर्क करण्यात आले आहे.



Coldrif Syrup (Batch No. SR- 13) Mfg. Dt. May- 2025, Exp. Dt. April 2027 manufactured by Sresan Pharma, Sunguvarchathiram, Kancheepuram District, Tamil Nadu यांच्या द्वारे उत्पादित केलेले असून त्यामध्ये डायथिलीन ग्लायकोल (Diethylene Glycol DEG) हा विषारी घटक मिसळलेला असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वसामान्य जनता यांनी तत्काळ या औषधाचा वापर थांबवावा. जर हे औषध कोणाकडे उपलब्ध असेल, तर ते जवळच्या अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यालयास त्वरित कळवावे किंवा ई-मेल: acfdartn2019@gmail.com च्या माध्यमातून थेट अन्न व औषध प्रशासनाला माहिती द्यावी.

या औषधाचा राज्यात वितरण झालेल्या साठ्याबाबत कारवाई घेण्याकरिता अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य येथील अधिकारी तामिळनाडू, औषध नियंत्रण विभागाशी समन्वय साधून या उत्पादनाच्या महाराष्ट्रातील वितरणाचा मागोवा घेत आहेत. राज्यातील विक्रेते, वितरक आणि रुग्णालये यांना या औषधाच्या समूह क्रमांकाचा साठा आढळल्यास त्याचे वितरण न करता तो सर्व साठा गोठवावा अशा सूचना सर्व औषध निरीक्षक व सहाय्यक आयुक्त यांना देण्यात आलेल्या आहेत. अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य याबाबत सर्व आवश्यक उपाययोजना करीत आहे. जनतेने सावधानता बाळगावी आणि धोका टाळावा, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

**कोल्ड्रिफ सिरप, बॅच नंबर SR-13, सध्या विक्री आणि वितरणासाठी प्रतिबंधित आहे, कारण तपासणीत त्यात डायथिलिन ग्लायकोल (Diethylene Glycol) नावाचे विषारी रसायन आढळले आहे. मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये कथितरीत्या काही मुलांच्या मृत्यूशी संबंधित असल्यामुळे हा बॅच अत्यंत धोकादायक मानला जातो.**

**शशिकांत यादव,**
**सहाय्यक आयुक्त,**
**महाराष्ट्रराज्य अन्न व {औषध} प्रशासन**

# जयभवानी महाविद्यालयात 'इंग्रजी भाषिक क्षमता वृद्धी' विषयावर एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा(प्रतिनिधी)**

शिक्षणमहर्षी माजी राज्यमंत्री आदरणीय शिवाजीराव दादा पंडीत यांच्या ८८ व्या वाढदिवसा निमित्त दरवर्षी प्रमाणे जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा(जि.बीड) आणि विसरवाडी शिक्षण संस्था संचलित लोकनेते माणिकराव गावित महाविद्यालय, विसरवाडी (ता. नवापूर, जि.नंदुरबार) यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दिनांक ०७ ऑक्टोबर २०२५ रोजी, 'इंग्रजी भाषिक क्षमता वृद्धी '(Enhancing Communicative Competence in English)' या विषयावर एक दिवसीय आभासी कार्यशाळा यशस्वीरित्या पार पडली. या वर्कशॉपचे उद्घाटन प्राचार्य डॉ. जयश्री गावित यांनी केले. या वेळी प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे यांनी अध्यक्षीय समारोप केला. या कार्यशाळेचे यशस्वी आयोजन प्रा.विनोद किर्दक, इंग्रजी विभाग प्रमुख आणि प्रा.संतोष धनेधर, इंग्रजी विभाग प्रमुख यांनी केले. विद्यार्थ्यांना शिक्षण आणि व्यावसायिक जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेली इंग्रजी भाषेतील प्रभावी संवाद कौशल्ये (Communicative Competence) आत्मसात करण्यास मदत करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. या कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषिक कौशल्यांच्या चौकट प्रणालीवर (LSRW - Listening, Speaking, Reading, Writing) मार्गदर्शन करण्यात आले. प्रथम सत्रात प्रा.धनंजय पाटील(धुळे) यांनी शब्दरचना (Vocabulary) आणि त्याचा वापर या वर मार्गदर्शन केले. तर द्वितीय सत्रात प्रा.सिद्धार्थ सावंत यांनी इंग्रजी मधील श्रवणशक्ती (Listening Comprehension) सुधारण्यासाठीचे तंत्र आणि भाषिक कौशल्य मिळविण्यासाठी विविध साधनांचा वापरासोबत ऑनलाईन उपलब्ध असलेल्या साधनांवरही चर्चा केली. कार्यशाळेत मोठ्या संख्येने विद्यार्थी, संशोधक आणि प्राध्यापक यांनी उत्साहाने सहभाग घेतला. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेत प्रभावीपणे संवाद साधण्यासाठी आत्मविश्वास आणि योग्य साधने मिळाली, ज्या मुळे त्यांच्या एकूण शैक्षणिक विकासाला चालना मिळेल. दोन्ही महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी केलेल्या या संयुक्त प्रयत्नांचे उपस्थितांनी कौतुक केले. या कार्यशाळेचे सुत्रसंचलन प्रा.विनोद किर्दक यांनी केले. तर प्रा.संतोष धनेधर यांनी प्रास्ताविक केले. तसेच आभार डॉ.संदिपान किवणे यांनी मानले. तंत्र सहाय्य डॉ. विशाल करपे यांनी केले.



## विश्वासाचे नाते

मानव हा राग, लोग, मत्सर, प्रेम, विश्वास इत्यादी भावनामय जीवन जगत असतो.या सगळ्यांमध्ये विश्वासाचे नाते खूपच वेगळे आहे. एखाद्या व्यक्तीवर आपण विश्वास ठेवला आणि त्याने जर विश्वास घात केला तर तो माणूस आपल्या हृदयातून कायम बाहेर फेकला जातो. परत आपल्या मनात लवकर जागा रिकामी शक्यतो होत नाही.

म्हणून या सर्व नात्याबरोबर विश्वासाचे नाते जे आहे नाते फार काळजीपूर्वक हाताळावे लागते. एखाद्या माणसावर टाकलेला आपला हा विश्वास तो विश्वासास किती पात्र आहे हे पाहूनच आपला विश्वास त्यावर ठेवावा

काही भोळी माणस अशी असतात की सर्वांवर विश्वास ठेवून विश्वासाचे नाते खूप छान जपत असतात. अशा माणसांना वाटतं की सगळं जग विश्वासू आहे. कारण ती व्यक्ती स्वतः इतरांनी सांगितलेल्या वर फार लवकर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतः एक विश्वास असलेली उत्तम व्यक्ती आहे. त्या व्यक्तीकडे सगळ्यांची गुपित असतात किंवा कोणीही त्यांच्यावर विश्वास ठेवल्यास ते विश्वासच पात्र असतात. ते कोणाचाही विश्वासघात करत नाही. सर्व जग अशा व्यक्तीवर डोळे झाकून विश्वास करु शकतात. मग अशी व्यक्ती देखील सर्वांवर विश्वास ठेवते. आणि सर्वांशी अशा रीतीने वागायला लागते.पण जग साधे नाही. जगामध्ये अनेक प्रकारच्या, विविध स्वभावाच्या व्यक्ती असतात. त्या प्रत्येक व्यक्तीवर विश्वास ठेवायचा का? तसे पाहता मला हा प्रश्न कधी आला नाही पण हल्ली जरा हा प्रश्न मला पडायला लागलेला आहे. आपण सर्वांशी छान वागतो. समोरची व्यक्ती आपल्या बरोबर देखील छानच वागतो असे वाटते अरे हा खरच किती छान आहे. पण इथेच आपला विश्वास तोडला जातो...

कारण आपण काही गोष्टी आपला म्हणून त्याला सांगतो पुढे तो त्याच गोष्टी पुढे इतरांना सांगत सुटतो. मग आपण त्याला आपल्या काही गोष्टी विश्वासाने त्याला सांगतो तो पुढे नको तिथे ते सांगतो हाच तो विश्वासघात!

आणि मग ज्यान विश्वासघात केलेला आहे त्याच्याबद्दल आपली मतं बदलायला सुरुवात होते. मग तो कितीही जवळचा असू दे, लांबचा असू दे तरीसुद्धा आपली मत बदलायला सुरुवात झाली की परत आपल्या मनात त्याची प्रतिमा चांगली होण्यास खूप अवधी लागतो.

एखाद्याच्या मनात शिरायला खूप वेळ लागतो. पण त्याच्या मनातून उतरायला एक क्षण पुरेसा होतो. एखाद्याच्या हृदया अंतरी जाऊन बसावे. विश्वासाचे नाते मनापासून जपावे.

असे हे विश्वासाचे नाते आहे.
विश्वासाचे नाते दृढ करावे
विश्वास संपादन करून
मानवाच्या अंतरी एकरूप व्हावे...
कोणाला फसवू नये
आपणही प्रामाणिक रहावे
जनमाणसात नाव कमवावे
विश्वासाचे नाते दृढ करावे....

**वसुधा वैभव नाईक**
**धनकवडी, जिल्हा- पुणे**

# विंचूर ग्रामपंचायत सदस्यांकडून दुहेरी निवेदन — विंचूर परिसरातील खड्डे तातडीने बुजविण्याची मागणी





**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विंचूर (ता. निफाड)** : विंचूर शहर व परिसरातील रस्त्यांची दयनीय अवस्था लक्षात घेता नागरिकांचा त्रास दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर विंचूर ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायत सदस्यांनी दोन स्वतंत्र निवेदनांद्वारे सार्वजनिक बांधकाम विभाग, निफाड तसेच बी अँड सी विभाग, नाशिक यांच्याकडे रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजविण्याची मागणी केली आहे.पहिल्या निवेदनात विंचूर तीनपाटी सर्कल, श्रीराम चौक ते लासलगाव रस्त्यावरील मोठमोठे खड्डे तातडीने बुजविण्याची विनंती करण्यात आली आहे. या रस्त्यावर दररोज अपघातांच्या घटना घडत असून, धुळीचे साम्राज्य आणि वाहतुकीतील अडथळे नागरिकांसाठी मोठा त्रास बनले आहेत. विशेषतः संत जनार्दन स्वामी कुटीये समोरील भाग अतिशय खराब स्थितीत असून, जीवघेणे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.दुसऱ्या निवेदनात विंचूर श्रीराम चौक ते नाशिक छत्रपती संभाजीनगर हायवेवरील खड्ड्यांची समस्या मांडण्यात आली आहे. सदस्यांनी नमूद केले आहे की, काही दिवसांपूर्वी खड्ड्यांमध्ये माती व खडी टाकण्यात आली होती, परंतु काही दिवसांतच ती निघून गेल्याने पुन्हा मोठे खड्डे निर्माण झाले आहेत. तसेच विंचूर हे मोठे कांदा मार्केट असल्याने या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ आहे. त्यामुळे अपघाताचा धोका अधिक वाढला आहे.दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर या मार्गावर गर्दी वाढणार असल्याने रस्ते तातडीने दुरुस्त करावेत, रस्त्यावर पसरलेली खडी हटवावी, त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात डांबरीकरण करून श्रीराम चौक धुळ मुक्त करावा अशी मागणी सदस्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.राजेंद्र मोरे, नानासाहेब जेऊघाले, इम्रान मोमीन, दिलीप चव्हाण,फिरोज मोमीन, भाऊसाहेब साहनखोरे उपस्थित होते श्रीराम चौक रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर धूळ साचल्यामुळे दुकानदार, राहिवासी आणि वाहनधारक त्रस्त आहेत. काही दिवसापूर्वी मुरूम आणि खडी टाकल्यामुळे खड्डे उघडे पडले आहेत त्यामुळे अपघात होत आहेत संबंधित अधिकाऱ्याने दोन तास उभे राहून तिथे उभे राहून दाखवावे मग समजेल जनतेचा त्रास लवकरात लवकर तेथे तात्पुरत्या स्वरूपात डांबरीकरण करावे अन्यथा मोठ्या स्वरूपात आंदोलन करण्यात येईल

# ए आय शेती ..



ए आय तंत्र ज्ञान ते
आता येणारं शेतीत
नव चैतन्य रूजवले
रे आता मायमातीत

स्वता बदलू भाग्यरेषा
नवीन तंत्रज्ञानासहीत
यशवंत हो बळीराजा
काळ नोंद घेई वहीत

- हेमंत मुसरीफ पुणे

# कुंभार समाज मुंबईतर्फे गुणवंत विद्यार्थी सत्कार व वधू-वर परिचय मेळावा उत्साहात पार

**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

**मुंबई :** कुंभार समाज मुंबईतर्फे आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ व वधू-वर परिचय मेळावा दादर येथील माडुंगा सांस्कृतिक केंद्रात मोठ्या उत्साहात पार पडला. समाजातील शैक्षणिक आणि सामाजिक बांधिलकी जोपासत दरवर्षी साजरा होणारा हा उपक्रम यंदाही उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थना, दीपप्रज्वलन आणि संतश्रेष्ठ गोरक्ष काकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. समाजसेवक सदाशिव भानू चिंदरकर, ज्यांना नुकताच "लोकरत्न पुरस्कार" प्राप्त झाला आहे, त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांनी ज्ञानासोबत चारित्र्य, परिश्रम व समाजसेवा या मूल्यांचा अंगीकार करावा, असे सांगितले.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राम प्रजापती (के.ई.एम. हॉस्पिटल), हरिश्चंद्र वसंत गिरकर (राष्ट्रपती पुरस्कार सन्मानित), गंगाधर देवडे (पोलीस अधिकारी), तानाजी नामदेव कुंभार (पोलीस अधिकारी) आणि दत्तात्रय रसाळकर (उद्योजक) यांनी उपस्थिती लावली. मान्यवरांनी समाजाच्या सातत्यपूर्ण शैक्षणिक कार्याचे कौतुक करत विद्यार्थ्यांना प्रगतीचा मार्ग दाखविला.

यावेळी दहावी, बारावी तसेच पदवी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवलेल्या ७५ हून अधिक विद्यार्थ्यांचा प्रशस्तिपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि पालकांच्या डोळ्यांत अभिमान दिसून येत होता. समाजाच्या शिष्यवृत्ती आणि मार्गदर्शन उपक्रमामुळे अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणाच्या वाटचालीत पुढे जात आहेत.













कार्यक्रमात वधू-वर परिचय मेळाव्याला समाजातील युवक-युवतींचा उत्तम प्रतिसाद मिळाला. १०० हून अधिक उमेदवारांनी सहभागी होऊन आपापले परिचय सादर केले. समाजातील तरुण पिढीला योग्य जोडीदार निवडण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरला.

या सोहळ्यात एक विशेष सन्मानाचा क्षणही अनुभवास आला. नुकताच प्रदर्शित होऊन प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलेला "कुर्ला टू वेंगुर्ला" या चित्रपटाचे दिग्दर्शक विजय कलमकर यांचा कुंभार समाज मुंबईतर्फे सन्मान करण्यात आला.

दिग्दर्शक विजय कलमकर यांचे वडील श्री धोंडू कलमकर हे कुंभार समाज मुंबईचे माजी अध्यक्ष असून, समाजासाठी त्यांनी केलेले मोलाचे योगदान उल्लेखनीय आहे. योगायोगाने दिनांक ५ ऑक्टोबर हा श्री धोंडू कलमकर यांचा जन्मदिन आणि त्याच दिवशी समाजाचा गुणवंत विद्यार्थी सत्कार व वधू-वर परिचय मेळावा या दोन्ही कार्यक्रमांचे आयोजन झाले होते.

हा सुवर्णकांचन योग साधत पदाधिकाऱ्यांनी धोंडू कलमकर यांना एक अनोखे "वाढदिवसाचे गिफ्ट" दिले आणि त्यांच्या सुपुत्राने फिल्मनिर्मिती क्षेत्रात संपादन केलेल्या यशाबद्दल विजय कलमकर यांचा सन्मान करण्यात आला.

याहूनही विशेष म्हणजे "मुलांची न होणारी लग्न" हा विषय मांडणारा "कुर्ला टू वेंगुर्ला" चित्रपट नेमका समाजाच्या वधू-वर परिचय मेळाव्याच्या पार्श्वभूमीवरच प्रमोट झाला, हा एक आनंददायी योगायोग ठरला.

कार्यक्रमाचे आयोजन अध्यक्ष विष्णू शिवराम मळेवाडकर, सचिव संजय जगन्नाथ गिरकर आणि कार्यकारिणी सदस्यांनी एकत्रितपणे केले. या वेळी समाजातील ज्येष्ठ मार्गदर्शक, महिला मंडळ सदस्य आणि नागरिक उपस्थित होते.

कुंभार समाजाने उभारलेल्या ग्रंथालय, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आणि शिष्यवृत्ती योजनांचा लाभ अनेक विद्यार्थ्यांना होत असून, या उपक्रमातून समाजाचे शैक्षणिक आणि सामाजिक योगदान अधिक बळकट होत असल्याचे मान्यवरांनी गौरविले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित बांधवांनी आयोजकांचे कौतुक करत पुढील काळात अशा समाजहिताच्या उपक्रमांची परंपरा पुढे चालू ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला.

# श्रीकृष्ण ज्वेलर्स शोरूमच्या भव्य उद्घाटन सोहळ्याची जय्यत तयारी....




**दैनिक. युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव :** सोयगाव शहरात सौंदर्य,विश्वास आणि गुणवत्तेचा संगम असलेल्या श्रीकृष्ण ज्वेलर्स शोरूमचे भव्यदिव्य उद्घाटन उद्या, दि. ८ ऑक्टोबर २०२५ रोजी बुधवार दुपारी ३ वाजता होणार आहे.या शोरूमचे उद्घाटन अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, त्र्यंबकेश्वर (जि. नाशिक) येथील आदरणीय चंद्रकांतदादा मोरे यांच्या शुभहस्ते होणार आहे. उद्घाटन सोहळ्यास विविध मान्यवर,व्यावसायिक, व्यापारी वर्ग,महिला मंडळ,तरुणाई तसेच राजकीय पक्षांचे नेते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.श्रीकृष्ण ज्वेलर्स शोरूममध्ये पारंपरिक तसेच आधुनिक दागिन्यांचा आकर्षक संगम पाहायला मिळणार असून,ग्राहकांसाठी विशेष उद्घाटन ऑफर्स ठेवण्यात आल्या आहेत.शोरूमचे संचालक यांनी नागरिकांना विश्वासार्ह आणि दर्जेदार सेवा देण्याचे आश्वासन दिले आहे.या भव्य उद्घाटन सोहळ्यामुळे सोयगाव शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांमध्ये या नवीन शोरूमबद्दल मोठी उत्सुकता दिसून येत आहे.

**नागरिकांच्या प्रतिक्रिया :**

"श्रीकृष्ण ज्वेलर्सच्या उद्घाटनाची आम्ही आतुरतेने वाट पाहत आहोत. सोयगावमध्ये अशा दर्जेदार शोरूमची गरज होती."— ग्राहक सौ.सुलेचनां अशोक पाटील

"विश्वास आणि गुणवत्ता या दोन गोष्टींवर श्रीकृष्ण ज्वेलर्स नक्कीच आपला ठसा उमटवेल." — प्रमोद रावणे, व्यापारी

"अशा नवीन उपक्रमांमुळे शहराचा विकास होईल आणि स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल." —मा.सैनिक शशीकांत काळे, नागरिक

"शोरूमच्या सजावटीची झलक पाहूनच भव्यतेचा अंदाज येतो. उद्याच्या कार्यक्रमाची आतुरता सर्वांनाच आहे." उद्घाटनानंतर शहरातील सुवर्णप्रेमींसाठी आकर्षक दागिन्यांचा नवा ठिकाणा म्हणून श्रीकृष्ण ज्वेलर्स नावारूपास येईल,असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला.

# पिंपरखेड – अहिल्यानगर एस.टी. बससेवेचा शुभारंभ : ग्रामीण भागासाठी दिलासा

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी-बाळासाहेब रकटाटे**

अंभोरा, सुलेमान देवळा, हिवरा आणि पिंपरखेड परिसरातील ग्रामस्थ, विद्यार्थी व शेतकरी बांधवांसाठी अत्यंत आनंदाची बातमी आहे. बीड जिल्ह्याचे लोकप्रतिनिधी खासदार बजरंग बाप्पा सोनवणे यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे पिंपरखेड – अहिल्यानगर या मार्गावरची एस.टी. बससेवा आजपासून सुरू करण्यात आली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून या भागातील नागरिकांना प्रवासासाठी योग्य सार्वजनिक वाहतुकीचा अभाव जाणवत होता. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाची बाजारपेठेत ने-आण करण्यासाठी आणि



सर्वसामान्य नागरिकांना दैनंदिन कामकाजासाठी प्रवासात अनेक अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर खासदार बजरंग बाप्पा सोनवणे यांनी या मागणीचा पाठपुरावा करून अखेर ही बससेवा मंजूर करून घेतली आहे.

या बससेवेच्या सुरूवातीमुळे विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयात पोहोचणे सुलभ होणार असून शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाची बाजारपेठेत वाहतूक करण्यासाठी आता परवडणारे व सोयीचे साधन मिळाले आहे. तसेच महिला प्रवाशांनाही कामानिमित्त प्रवासासाठी सुरक्षित आणि सोयीस्कर पर्याय उपलब्ध झाला आहे.ग्रामस्थांनी या निर्णयाचे मनःपूर्वक स्वागत केले असून खासदार बजरंग बाप्पा सोनवणे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

"खासदार साहेबांच्या प्रयत्नांमुळे आमच्या भागात विकासाचे नवे दार खुले झाले आहे," असे मत स्थानिक ग्रामस्थांनी व्यक्त केले.

ग्रामपंचायतींकडून प्रवाशांना वेळेवर प्रवास करून बससेवा नियमित ठेवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# राज्यस्तरीय एअर रायफल शूटिंग चॅम्पियनशिप साठी अरशान सय्यद याची निवड

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**

आष्टी तालुक्यातील कडा येथील वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महावीर इंग्लिश स्कूल या सी बी एस ई बोर्ड मान्यताप्राप्त शाळेचा विद्यार्थी अरशान तौफिक सय्यद (ई - ७ वी) याची राज्यस्तरीय एअर रायफल शूटिंग साठी निवड करण्यात आली.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या वतीने छत्रपती संभाजी नगर येथे विभागीय स्तरावर पीप साईट एअर रायफल शूटिंग स्पर्धा -२०२५-२६ चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १४ वर्ष वयोगटाखालील स्पर्धेमध्ये त्याने तिसरा क्रमांक मिळवून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपले नाव निश्चित केले आहे.त्याला क्रीडा शिक्षक अहेमद पठाण आणि वैशाली शिंदे यांनी मार्गदर्शन केले.त्याच्या या उत्कृष्ट कामगिरी बद्दल संस्थेचे अध्यक्ष-श्री अमितजी राठोड,उपाध्यक्ष-श्री.संदिपजी चानोदीया,सचिव - श्री.हेमंतजी मेहेर, कोषाध्यक्ष-श्री डॉ.प्रमोदजी भळगट तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी श्री



मनीषजी गांधी,श्री.प्रकाशजी श्रीश्रीमाळ,श्री.अमोलजी पटवा,श्री. संजयजी पितळे,श्री. संतोषजी गांधी, मुख्याध्यापक - श्री अभिलाष के. के,सल्लागार श्री मेहेर सर आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# पनवेल महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग स्टॉल धारकांना त्वरित परवाने देण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे साहेब दिव्यांग संघटने तर्फे पनवेल महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग स्टॉल धारकांना त्वरित परवाने मिळावे याचे निवेदन 6 ऑक्टोबर रोजी देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र दिव्यांग विकास फाउंडेशनचे जिल्हाप्रमुख भरत ज्ञानदेव जाधव, दिव्यांग विकास आघाडीचे उत्तर जिल्हा संयोजक विलास फडके, अतुल रायबोले, नवनाथ गाढवे आणि इतर दिव्यांग बांधव उपस्थित होते.

पनवेल महानगर पालिका हद्दीत दिव्यांग स्वयंरोजगार (स्टॉल) माध्यमातून अनेक वर्षापासुन व्यवसाय करत आहेत. परंतु त्यांना पनवेल महानगरपालिका वारंवार अतिक्रमण कारवाई करत आहे. त्यामुळे दिव्यांग स्टॉल धारकांवर नेहमी भीतीची टांगती तलवार असते. या विरोधात अनेक आंदोलने उपोषणे केली, मोर्चे काढले परंतु पनवेल मनपा आयुक्त



फक्त आश्वासन देतात की सर्व दिव्यांग स्टॉल धारकांचे सर्वे करून तुम्हाला परवाने देतो. आजपर्यंत पनवेल महानगरपालिका स्थापन झाली तेव्हापासून चार वेळा आयुक्त आले आणि गेले.

प्रत्येक आयुक्त फक्त आश्वासनाची पाने दिव्यांगांच्या तोंडाला पुसत असल्याचा आरोप दिव्यांग बांधव करत आहेत. ठराविक संघटनांच्या स्टॉल धारकांना परवाने दिलेले आहेत. इतर दिव्यांगांना परवाने का देत नाहीत हा दुजाभाव, भेदभाव का? केला जात आहे असा सवाल विचारला जात आहे. खासदारांनी याकडे स्वतः लक्ष घालून पनवेल महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग स्टॉलला कायमस्वरूपी परवाने मिळवून द्यावेत अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# मुख्य न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा किनवट अभिवक्ता संघाकडून तीव्र निषेध

**दैनिक युवक आधार**
**(विशेष प्रतिनिधी) विशाल भालेराव**

**किनवट :** भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या घटनेचा अभिवक्ता संघाने तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला आहे. या निषेधार्थ न्यायालयातील वकीलांनी आज (ता.७) न्यायालयीन कामकाजात सहकार्य न करण्याचा निर्णय घेतला आहे.

या संदर्भात अभिवक्ता संघाच्या वतीने दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) यांना निवेदन देण्यात आले असून, त्यात सर्वोच्च न्यायालयातील आदरणीय न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यावर ॲड. राकेश यांनी वस्तू फेकून केलेल्या हल्ल्याच्या प्रयत्नाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

संघाच्या निवेदनात म्हटले आहे की, "न्यायदान ही लोकशाहीची पवित्र प्रक्रिया असून न्यायसंस्थेचा सन्मान हा लोकशाहीच्या मूलभूत स्तंभांपैकी एक आहे. न्यायव्यवस्थेवर अशा प्रकारे अपमानास्पद वर्तन करणा-या




व्यक्तीवर कठोर कारवाई करण्यात यावी," अशी मागणी संघाने केली आहे.


या प्रसंगी अभिवक्ता संघाच्या तातडीच्या बैठकीत हा ठराव एकमताने पारित करण्यात आला. वकील संघाने सर्व न्यायिक अधिकाऱ्यांना विनंती केली आहे की, आजच्या दिवशी कोणत्याही प्रकरणात ॲडव्हर्स ऑर्डर (Adverse Order) देऊ नये आणि संघाच्या ठरावास सहकार्य करावे.

या निवेदनावर अध्यक्ष ॲड. किशोर के. मुनेश्वर, उपाध्यक्ष ॲड. टेकसिंग आर. चव्हाण, सचिव ॲड. माज. एस. बडगुजर, सहसचिव ॲड. एस. के. मुसळे, कोषाध्यक्ष ॲड. सम्राट एम. सर्पे, आणि ग्रंथपाल ॲड. विशाल बी. कानिदे यांच्यासह सर्वच जेष्ठ व कनिष्ठ वकीलांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# धानोरा येथे विरंगना महाराणी दुर्गावती मडावी जयंतीनिमित्त कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी: -जितेंद्र खोडे**

**राळेगाव:-** तालुक्यातील धानोरा येथे विरंगना महाराणी दुर्गावती मडावी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली,भारताच्या गौरवशाली गोंडवाना साम्राज्याच्या शूर साम्राज्ञी,वीरांगना महाराणी दुर्गावती मडावी यांच्या जयंतीनिमित्त सोमवार दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी महाराणी दुर्गावती मडावी चौक, धानोरा येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रफुल्ल गेडाम यांच्या हस्ते वीरांगना राणी दुर्गावती मडावी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण




करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी राणी दुर्गावती यांच्या शौर्यगाथेचे स्मरण करून त्यांचे राष्ट्रप्रेम,आत्मत्याग आणि नेतृत्वगुण यांचा गौरवपूर्वक उल्लेख केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष जे एस.एम.फिजिकल अकॅडमीचे संस्थापक प्रफुल गेडाम प्रमुख वक्त्या गायत्री कंगाली,प्रमुख पाहुणे भारतीय जनता पार्टीचे तालुका उपाध्यक्ष डॉं.कुणाल भोयर,उपसरपंच विशाल येणोरकर, ग्रामपंचायत सदस्य विजय चकोले, कैलास कोडापे (पत्रकार), डॉं.शामसुंदर गलाट,विशाल साखरकर,चंद्रशेखर कामडी या सर्व पाहुण्याच्या हस्ते विरांगना महाराणी दुर्गावती पुतळ्याचे पूजन करून पुष्पहार अर्पण केले,व पाहुण्यानी मनोगत व्यक्त करून व आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली व तसेच विरंगणा महाराणी दुर्गावती उत्सव समिती यांनी अतिशय सुंदर कार्यक्रम पार पाडला.

# कांदा उत्पादकांचा संताप उफाळला!; दि.१० ऑक्टोबरला विंचूर येथे रस्ता रोको आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विंचूर :-** कांद्यास मिळणाऱ्या अत्यल्प दरामुळे शेतकऱ्यांचा संताप उसळला असून या पार्श्वभूमीवर शुक्रवार, दिनांक १० ऑक्टोबर रोजी विंचूर येथील संभाजीनगर महामार्गावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष निवृत्ती गारे पाटील यांनी दिली आहे.सलग पाच महिन्यापासून उन्हाळी कांद्यास अत्यल्प दर मिळत आहेत. त्यातच आता रांगड्या कांद्यास अवघा दिडशे ते दोनशे रुपये प्रति क्विंटल दर मिळत आहे. त्यामुळे कांद्याचे भाव उत्पादन खर्चही भागवू शकत



नाहीत, अशा स्थितीत शेतकऱ्यांचा संयम अखेर सुटला आहे. मे-जून महिन्यापासून कांदा साठवून ठेवलेला असून, बाजारात दर केवळ ६ ते ८ रुपये प्रतिकिलोच्या घरातच थांबले आहेत. त्यामुळे साठवणूक, मजुरी, वाहतूक अशा सर्व खर्चानंतर शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागत आहे. सरकारने कांदा दरवाढ रोखण्यासाठी निर्यात बंदी, साठा मर्यादा यांसारखे निर्णय घेतल्याने बाजारपेठ कोसळली आहे. या पार्श्वभूमीवर शुक्रवार, दिनांक १० ऑक्टोबर रोजी विंचूर येथील संभाजीनगर महामार्गावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात परिसरातील सर्व कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेचे जिल्हाध्यक्ष निवृत्ती गारे पाटील, पंकज घोटेकर, अनिल घोटेकर, रामदास गवळी, भाऊसाहेब तासकर, समाधान घोटेकर, नामदेव घोटेकर यांनी केले आहे.

**निफाड तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या बैठकीत हा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. बैठकीत शेतकऱ्यांनी केंद्र व राज्य सरकारने तातडीने कांद्याला हमीभाव जाहीर करावा, निर्यातबंदी उठवावी आणि बाजार हस्तक्षेप योजना तात्काळ राबवावी, अशा मागण्या केल्या. जर सरकारने तातडीने निर्णय घेतला नाही, तर हे आंदोलन केवळ विंचूरपुरते मर्यादित राहणार नाही; राज्यभर तीव्र स्वरूप धारण करेल.**

# लायन्स इंटरनॅशनल लायन्स डिस्ट्रिक्ट व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष युवासेना कडून महिलांना स्वयंरोजगार

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

लायन्स इंटरनॅशनल तर्फे रोज नवनवीन सेवा कार्य करून समाजाभिमुख उपक्रम राबवून ऑक्टोबर महिन्यात हा सेवा सप्ताह साजरा केला जातो.

लायन्स इंटरनॅशनल लायन्स डिस्ट्रिक्ट ३२३१ ए आय यांच्या लायन सेवा सप्ताह ऑक्टोबर साजरा करीत असताना अर्पण सेवा महोत्सव अंतर्गत डिस्ट्रिक्ट यांच्या वतीने व शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष युवासेना, शिव आरोग्य सेना यांच्या संयुक्त विद्यमाने मा.पंडितजी शुक्ला महाराष्ट्र




राज्य संघटक मा. जितेंद्र दगडू (दादा ) सकपाळ शिव आरोग्य सेना महाराष्ट्र राज्य सरचिटणीस तसेच शिवआरोग्य सेना उरण पनवेल समन्वयक व शिवसेना द्रोणागिरी शहर विभाग प्रमुख मा .रुपेश अविनाश पाटील यांच्या विशेष प्रयत्नाने द्रोणागिरी मधील १० गरजू महिलांना स्वयंरोजगार करून स्वतःच्या पायावर उभे राहता यावे, याकरता शिलाई मशीनचे वाटप करण्यात करण्यात आले.वितरण शुभ प्रसंगी द्रोणागिरी शहर विभाग प्रमुख रुपेश अविनाश पाटील यांच्यासह द्रोणागिरी शहरप्रमुख जगजीवन भोईर शहर संघटक किसन म्हात्रे युवा सेना उरण तालुका अधिकारी करण पाटील व्यापारी अध्यक्ष रवींद्र पाटील द्रोणागिरी विभाग प्रमुख अंकुश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभली पात्र व गरजू महिलांनी रुपेश अविनाश पाटील,करण हरिश्चंद्र पाटील अंकुश चव्हाण यांचे आभार मानले.

# हॉस्पिटल मध्ये बेड वर असताना ज्या पेशंटची डोळे उघडण्याची गॅरन्टी नव्हती त्याच पेशंट कडून आठवड्याभरात झाला सत्कार...

**दैनिक युवक आधार**
**परतूर जालना(अशोक ठोके)**

साठ वर्षीय रुग्णाला छातीत दुखू लागल्यामुळे पेशंटचे नातेवाईक रुग्णाला परतूर येथील कोठाळकर हॉस्पिटलमध्ये घेऊन आले.तपासणीनंतर ईसीजी काढला त्यामध्ये बरेच बदल दिसून आले. पेशंटला आयसीयू मध्ये ॲडमिट करण्याचा सल्ला दिला. थोड्या वेळानंतर पेशंटच्या छाती व पाठीमध्ये दुखू लागले, दम लागू लागला, परत इसीजी केला, त्यामध्ये हृदयाची गती खूप जास्त वाढलेली व अनियमित होती.(AF WITH FAST VR) BP=80/60, H.R- 148/Min. बीपी खूप कमी (नॉट रेकॉर्डेबल) असल्यामुळे नातेवाईकांच्या परवानगी ने पेशंटला शॉक देण्याचे ठरले. पहिला 100 J शॉक दिल्यानंतर पेशंट थोडीशी स्टेबल झाली,पण नंतर दहा मिनिटांनी पेशंटला पुन्हा त्रास सुरू झाला. श्वास घेण्यास त्रास होऊ लागला, छाती व पाठीमध्ये दुखून मोठा श्वास घेत पेशंट बेशुद्ध पडली. शरीर थंडगार पडले. बीपी नॉट रेकॉर्डेबल, नाडी गती मंद, ECG-AF WITHFAST VR. दुसऱ्या वेळेस 150 J शॉक दिला.शॉक दिल्यानंतर पेशंट शुद्धीत आली,





डोळे उघडून बोलू लागली आणि थोड्याच वेळात बऱ्यापैकी स्टेबल झाली.

त्यानंतर पेशंटला पुढील तपासण्या व उपचारासाठी समोर पाठवण्यात आले. एमआईटी संभाजीनगर येथे मृत्यूशी झुंज देऊन आठ दिवसानंतर रुग्णाला सुखरूप घरी आणण्यात आले. घरी आल्यावर दुसऱ्याच दिवशी पेशंट व नातेवाईक भेट घ्यायला कोठाळकर हॉस्पिटल येथे आले व त्यांनी डॉ. कोठाळकर यांचा सत्कार केला.

आपण कोणाच्या तरी आयुष्याचे अजून काही दिवस त्यांच्या पदरात घालू शकलो या विचाराने समाधान मिळतं असल्याचे मत डॉ. कोथळकर यांनी आमचे प्रतिनिधी अशोक ठोके यांच्याशी बोलताना व्यक्त केले.

# महेंद्रशेठ घरत यांची जिल्हाध्यक्षपदाची कारकीर्द उत्तम!

## पेण विधानसभा प्रभारी मनोज कांबळे यांचे मत

**दैनिक युवक आधार**

**उलवे,वार्ताहर :** "महेंद्रशेठ घरत तुम्ही काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष म्हणून उत्तम काम करताय. जिल्ह्यातील तुमचे तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचण्याचे काम कौतुकास्पद आहे. त्याबद्दल अभिनंदन," असे पेण विधानसभा प्रभारी मनोज कांबळे यांनी पेण येथे काँग्रेस कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना मत व्यक्त केले. पेण येथे काँग्रेसची आढावा बैठक मंगळवारी संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठकी झाली.

"कार्यकर्त्यांनी आपापसातील संवाद वाढवावा, एकमेकांच्या सुख-दुःखात जा, अनेक जुनेजाणते कार्यकर्ते आहेत. त्यांना सन्मानाने आपल्याकडे बोलवा.




मतभेद मिटवा, व्हॉटसअप युनिर्व्हिसीटूतून बाहेर पडा, अडल्यानडल्या कार्यकर्त्यांच्या मदतीला धावून जा," असा सल्ला जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी पेण येथील काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना दिला.

"मतदारसंघात पोकळी निर्माण झाली आहे, पण मी जिल्हा परिषद निवडणूक लढवीन, " असे पर्यावरण विभागाचे अध्यक्ष राजू पाटील यांनी सांगितले.

तीन ते पाच जागा लढायला हव्यात. वाशी, वडखळ पंचायत समितीच्या जागा लढविणार, असे काही कार्यकर्त्यांनी मत व्यक्त केले.

यावेळी पेण विधानसभा प्रभारी मनोज कांबळे, सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, माजी सरचिटणीस चंद्रकांत पाटील, तालुकाध्यक्ष अशोक मोकल, शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, जिल्हा सरचिटणीस देवेंद्र म्हात्रे, रोहित म्हात्रे आदी मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.